सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - ३४ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शुक्रवार दि. २१ फेब्रुवारी २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## संगमावरील पाणी अल्कलाईन एवढे शुद्ध; प्रयागराज महाकुंभच्या प्रदुषणावर पद्मश्री डॉ.अजय सोनकर यांचा दावा

### संगम, अरैलसह पाच घाटांवरील पाण्याचे नमुने टेस्ट करण्यात आल्याचाही दावा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१प्रयागराज**

काही दिवसांपूर्वी केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने एनजीटीला अहवाल सोपविला होता, महाकुंभमधील संगमावरच्या पाण्यात फेकल कोलिफॉर्म बॅक्टेरिया सापडल्याचे यात म्हटले होते. यामुळे हे पाणी अंघोळीसाठी किंवा पिण्यासाठी लायक नसल्याचे म्हटले होते. या गंगाजलाच्या शुद्धतेवर प्रश्न उपस्थित केले जात असताना आता पद्मश्री डॉ. अजय सोनकर यांनी गंगाजलाचे परीक्षण केले आहे. यामध्ये गंगाजल अंघोळ करण्यासच योग्य नाही तर अल्कलाईन पाण्याएवढे शुद्ध असल्याचा दावा त्यांनी केला आहे. संगम, अरैलसह पाच घाटांवरील पाण्याचे नमुने टेस्ट करण्यात आल्याचा दावा त्यांनी केला आहे. ५७ कोटी लोक अंघोळ करून गेले तरी या पाण्याच्या शुद्धतेत काही फरक पडला नसल्याचे ते म्हणाले आहेत. सोनकर यांनी त्यांच्या नैनी येथील लॅबमध्ये हे परीक्षण केले आहे. या पाण्याच्या शुद्धतेवर प्रश्न उपस्थित करणाऱ्यांना त्यांनी आपल्या प्रयोगशाळेत येऊन टेस्टिंग करण्याचे आव्हानही दिले आहे.



तीन महिन्यांच्या सतत संशोधनातून गंगेचे पाणी सर्वात शुद्ध असल्याचे सिद्ध झाले आहे. येथे आंघोळ केल्याने कोणत्याही प्रकारचे नुकसान होऊ शकत नाही. बॅक्टेरियोफेज (जीवाणू खाणारा) असल्यामुळे गंगेच्या पाण्याची शुद्धता अबाधित राहते, असा दावा त्यांनी केला आहे. पाण्याचे नमुने प्रयोगशाळेत १४ तास ठराविक तापमानावर ठेवल्यानंतरही त्यात विषाणूंची वाढ झालेली नाही. गंगाजल केवळ आंघोळीसाठी सुरक्षित नाही, तर त्याच्या संपर्कात आल्याने त्वचेचे आजारही होत नाहीत, असे ते म्हणाले.

कोट्यवधी भाविकांनी स्नान केले असूनही, पाण्यात बॅक्टेरियाची वाढ झाली नाही किंवा पाण्याच्या पीएच पातळीत कोणतीही घट झाली नाही, असे यात दिसले आहे. गंगेच्या पाण्यात ११०० प्रकारचे बॅक्टेरियोफेज असतात. जे कोणत्याही हानिकारक जीवाणूंचा नाश करतात. यामुळे हे पाणी प्रदुषित झाले नसल्याचा दावा त्यांनी केला आहे. गंगेच्या पाण्याची आम्लता (पीएच) सामान्यपेक्षा चांगली होती आणि त्यात कोणताही दुर्गंधी किंवा बॅक्टेरियाची वाढ आढळली नाही. पीएच पातळी देखील ८.४ ते ८.६ दरम्यान आढळून आल्याचे ते म्हणाले. सोनकर हे प्रयागराजच्या नैनीचे राहणारे आहेत. कृत्रिमरित्या मोती वाढवून त्यांनी मोठी क्रांती केली होती. यामुळे माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या हस्ते पद्मश्री पुरस्कार देण्यात आला होता.

## सोनिया गांधी रुग्णालयात दाखल डॉक्टरांनी दिली प्रकृतीबद्दल अपडेट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१नवी दिल्ली**

काँग्रेस संसदीय पक्षाच्या अध्यक्षा सोनिया गांधी यांना पोटाच्या आजारामुळे दिल्लीतील सर गंगाराम रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. रुग्णालयाच्या निवेदनानुसार, काल (गुरुवारी) सकाळी ८:३० वाजता त्यांना नियमित वैद्यकीय तपासणीसाठी दाखल करण्यात आले आहे.



सोनिया गांधी यांची प्रकृती सध्या स्थिर आहे. त्यांना रुग्णालयात डॉक्टरांच्या निरीक्षणाखाली ठेवण्यात आले आहे. सोनिया गांधी यांची नियमित तपासणी करण्यात आली असून, त्यांची प्रकृती स्थिर आहे. त्यांना आता डॉक्टरांच्या निरीक्षणाखाली ठेवण्यात आले आहे, असे वृत्त एएनआयने दिले आहे.

सोनिया गांधी यांच्या प्रकृतीबद्दल अधिक माहिती देताना, सर गंगा राम रुग्णालयाच्या व्यवस्थापन मंडळाचे अध्यक्ष डॉ. अजय स्वरूप यांनी सांगितले की, पोटाच्या काही समस्येमुळे त्यांना आज (गुरुवारी) रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. पण, काळजी करण्यासारखे काही नाही आणि उद्या सकाळपर्यंत त्यांना डिस्चार्ज मिळण्याची शक्यता आहे.

## सरकारी जाहिरातीतून अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षांचा फोटो गायब

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१पुणे**

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन दिल्लीत सुरू झाले आहे, त्याच्या स्वागतासाठी राज्य सरकारने दिलेल्या जाहिरातीतून संमेलनाध्यक्षांचे छायाचित्रच गायब केल्याबद्दल काँग्रेसने सरकारवर टीका केली. सरकारमध्ये औषधालादेखील सभ्यता शिल्लक राहिलेली दिसत नाही असे काँग्रेसने म्हटले आहे.

पक्षाचे राज्य प्रवक्ते हनुमंत पवार यांनी यावरून सरकारला टोकले आहे. देशाच्या राजधानीत, म्हणजेच दिल्लीत व एका अर्थाने परराज्यात मराठीजन संमेलनासाठी म्हणून तीन दिवस मुक्काम करणार आहेत. त्यांना राज्य सरकारचा संपूर्ण पाठिंबा आहे हे दर्शवणे सरकारचे कर्तव्यच आहे. त्यामुळे त्यासाठी जाहिराती दिल्या हे योग्यच आहे, मात्र संमेलनाच्या स्वागतासाठी म्हणून दिलेल्या या जाहिरातींमधून संमेलनाच्या अध्यक्ष असलेल्या ज्येष्ठ साहित्यिका डॉ. तारा भवाळकर यांचे छायाचित्रच वगळणे म्हणजे कमरेचे सोडून डोक्याला गुंडाळणे आहे असे पवार म्हणाले. डॉ. भवाळकर यांचे छायाचित्र असणे, संमेलनाचे संयोजक, आयोजक असलेल्या संस्थांची नावे देणे योग्य व




समयोचितच होते, मात्र त्याचे भान सरकारला राहिले नाही अशी टीका पवार यांनी केली.

संमेलनाध्यक्ष नाहीत, मात्र त्याच संमेलनाचे उदघाटक असलेले पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे संत तुकाराम महाराजांच्या वेशभुषेतील छायाचित्र आहे. त्यांच्या समवेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस त्याच वेशात आहेत, खालील बाजूस पुन्हा मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री व भाषा विकासमंत्रीही आहेत, फक्त संमेलनाध्यक्ष मात्र नाहीत हे अयोग्य व सत्ता आमचीच, आम्ही करू तेच खरे, अशा वृत्तीचे द्योतक आहे, सुजाण महाराष्ट्र व मराठी साहित्य रसिक सरकारचा हा अगोचरणा सहन करणार नाहीत असे मत पवार यांनी व्यक्त केले. सरकारने याबाबतीत त्वरीत दिलगिरी व्यक्त करावी, नव्याने पुन्हा संमेलनाध्यक्षांच्या छायाचित्रासहित जाहिरात द्यावी अशी मागणीही त्यांनी केली.

## बदनापूरमध्ये परीक्षा केंद्रावर दगडफेक, पेपर फुटला नसल्याचा प्रशासनाचा दावा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१जालना**

बदनापूर येथील जिल्हा परिषद प्रशालेमध्ये असलेल्या परीक्षा केंद्रावर आज पेपर फुटल्याचा दावा करण्यात येत आहे. शिक्षण विभागाकडून मात्र, या परीक्षा केंद्रावर पालक वर्गाकडून दगडफेक झाल्याचा दावा करण्यात येत आहे. बदनापूर येथील जिल्हा परिषद प्रशाला येथे इयत्ता दहावीचे परीक्षा केंद्र आहे. या परीक्षा केंद्रामध्ये एकूण १४ हॉल असून ३२८ विद्यार्थी यांनी आज मराठी विषयाचा पेपर दिला हा




पेपर सुरू झाल्यानंतर सुमारे तासाभरापूर्वी हा पेपर बाहेर आल्याचा दावा नागरिकांमधून होत आहे

आजपासून सुरू झालेल्या दहावीच्या बोर्ड परीक्षेच्या दरम्यान, जालना जिल्ह्यातील बदनापूर येथील एका केंद्रावर मराठी विषयाची प्रश्नपत्रिका अवघ्या पंधरा मिनिटांतच परीक्षा केंद्राबाहेर आली. त्यानंतर शहरातील झेरॉक्स सेंटरवर प्रश्नांची उत्तरे तयार करून त्याचे सेट करण्यात आले. हे सेट परीक्षा हॉलमधील विद्यार्थ्यांना चोरट्या मार्गाने पुरवण्यात आल्याचा दावा नागरिकांनी केला. मात्र, प्रशासनाने असा कोणताही प्रकार झाला नसल्याचे सांगितले. प्रश्न पत्रिका परिक्षा केंद्राच्या बाहेर आलेली नाही. तथापी याठिकाणी दगडफेक झाली असल्याचे प्रशासनाने सांगितले.

**दहावीचा मराठीचा पेपर फुटला नाही**

आज काही वृत्त वाहिन्यानी 'जालना जिल्ह्यातील बदनापूर शहरात दहावीचा मराठी विषयाचा पेपर फुटला' या आशयाचे चूकीचे वृत्त प्रसारित करण्यात आले आहे. परंतू प्रत्यक्षात असा कोणताही प्रकार घडलेला नसुन, स्थानिक झेरॉक्स दूकानदारांनी आजच्या मराठी विषयाच्या प्रश्न पत्रिकेत न आलेल्या प्रश्नांची झेरॉक्स काढून विक्री केली आहे. प्रश्न पत्रिका परिक्षा केंद्राच्या बाहेर आलेली नाही. तथापी याठिकाणी दगडफेक झाली. याबाबत दोषीं व्यक्तीचा शोध घेवून गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही सुरु असल्याचे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी कळविले आहे.

## रेल्वे स्टेशनवरील चेंगराचेंगरीचे व्हिडिओ काढून टाका

### रेल्वे मंत्रालयाचे सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सला आदेश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१नवी दिल्ली**

नवी दिल्ली रेल्वे स्थानकावर १५ फेब्रुवारी रोजी रात्री झालेल्या चेंगराचेंगरीत १८ जणांचा मृत्यू झाला होता. तर अनेक जण जखमी झाले. महाकुंभ मेळ्याला जाण्यासाठी प्रवाशांची रेल्वे स्थानकावर प्रचंड गर्दी झाली होती. त्यादरम्यान एक्स्प्रेसमध्ये चढण्यासाठी धावपळ सुरु झाली आणि चेंगराचेंगरीची घटना घडली. त्यानंतर आता रेल्वे मंत्रालयाने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सला (पूर्वीचे ट्विटर) नवी दिल्ली रेल्वे स्थानकावरील चेंगराचेंगरीच व्हिडिओ काढून टाकण्यास सांगितले आहे. रेल्वे मंत्रालयाने एक्सला चेंगराचेंगरीतील मृतांचे व्हिडिओ असलेल्या २८५ सोशल मीडिया लिंक्स काढून टाकण्याचे निर्देश दिले आहेत. डिसेंबरमध्ये थेट सोशल मीडिया लिंक्स काढण्याचे अधिकार मिळाल्यानंतर मंत्रालयाची ही पहिली मोठी कारवाई आहे.



हिंदुस्तान टाईम्सच्या वृत्तानुसार, रेल्वे मंत्रालयाने एक्सला १५ फेब्रुवारी रोजी नवी दिल्ली रेल्वे स्थानकावर झालेल्या चेंगराचेंगरीचे व्हिडिओ असलेल्या २८५ सोशल मीडिया लिंक्स काढून टाकण्याचे निर्देश दिले आहेत. मंत्रालयाने १७ फेब्रुवारी रोजी नैतिक मानदंड आणि प्लॅटफॉर्मच्या कंटेटच्या धोरणाचा हवाला देऊन एक नोटीस जारी केली आहे आणि ३६ तासांच्या आत कारवाई करण्याची विनंती केली आहे. असे व्हिडिओ शेअर केल्याने सार्वजनिक अशांतता निर्माण होऊ शकते आणि रेल्वेच्या कामामध्ये व्यत्यय येऊ शकतो, असं नोटीसमध्ये असे म्हटले आहे.

हे केवळ नैतिक नियमांच्या विरोधात नाही तर एक्सच्या कंटेटच्या धोरणाचे देखील उल्लंघन करते, कारण असे व्हिडिओ अनावश्यक कायदा आणि सुव्यवस्थेच्या समस्या निर्माण करू शकतात. सोशल मीडियावरील सामग्री भारतीय रेल्वेच्या कामकाजात व्यत्यय आणू शकते, विशेषत: जेव्हा ट्रेनमध्ये सध्या खूप गर्दी आहे, असं रेल्वे मंत्रालयाने म्हटलं आहे.

## देवेंद्र फडणवीस, अजित दादांची डोकेदुखी वाढणार; धनंजय मुंडेंच्या राजीनाम्यासाठी अण्णा हजारे मैदानात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अहिल्यानगर**

बीड जिल्ह्यातील मस्साजोगच्या सरपंच संतोष देशमुख हत्याकांडातील मुख्य सूत्रधार वाल्मिक कराड हा धनंजय मुंडे यांचा निकटवर्तीय आहे. त्याशिवाय हत्याकांडातील इतरआरोपी देखील मुंडे यांच्या जवळचे असल्याचा आरोप विरोधकांकडून होत आहे. या प्रकरणाचा निष्पक्ष तपास होण्यासाठी विरोधकांकडून मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी होत आहे. तसेच धनजंय मुंडे कृषीमंत्री असताना झालेल्या भ्रष्टाचाराचे आरोप भाजप आमदार सुरेश धस आणि सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी विविध पुरावे सादर केले आहेत. तरीही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार) प्रमुख अजित पवार हे धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याचा मुद्दा एकमेकांकडे टोलवत आहेत. या प्रश्नावर आता ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते अण्णा हजारे मैदानात उतरणार



आहेत. धनंजय मुंडे यांनी मंत्रिपदाचा राजीनामा द्यायला पाहिजे, असे मत त्यांनी व्यक्त केले आहे. यामुळे आता फडणवीस सरकारची आणि अजित पवार यांची डोकेदुखी वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.मंत्र्यांचे आचार-विचार शुद्ध असले पाहिजे. सुरुवातीला हे चुकलं की नंतर अशा घटना घडतात. त्यामुळे राज्याचे, समाजाचे आणि देशाचं नुकसान होतं. याचा विचार करणं गरजेचे असल्याचंही अण्णा हजारे म्हणाले.

**मुंडे-कोकाटेंनी राजीनामा दिला पाहिजे**

ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते अण्णा हजारे यांना माजी कृषीमंत्री तथा विद्यमान अन्न आणि नगरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे आणि कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांच्याविषयी विचारणा करण्यात आली. यावर भाष्य करताना अण्णा हजारे यांनी कोकाटे आणि धनंजय मुंडे यांचे नाव घेत नसले तरी अप्रत्यक्षपणे त्यांच्यावर टीकास्त्र सोडले आहे. मंत्रिमंडळात असलेल्या मंत्र्यांवर आरोप झाल्यास जबाबदारी म्हणून पहिले त्यांनी राजीनामा दिला पाहिजे. त्यामुळे त्यांची आणि सरकारचही प्रतिमा वाढते. कारण जनता ही मंत्र्यांकडे बघून अनुकरण करत असते. तुम्हीच जर वाट सोडून चालला तर जनता कुठे जाणार, अशा लोकांना मंत्रीमंडळात घेण्याआधी विचार करणे गरजेचे आहे., असे म्हणत अण्णा हजारे यांनी मुख्यमंत्री फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनाही अप्रत्यक्ष टोला लगावला.

## शिक्षा ठोठावलेल्या माणिकरावांना आणखी झटका बसण्याची शक्यता

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१नाशिक**

१९९५ मधील एका प्रकरणात माणिकराव कोकाटे आणि त्यांचे बंधू सुनील कोकाटे नाशिक सत्र न्यायालयाने शिक्षा सुनावली आहे. त्यामुळे आता कोकाटे यांची विधिमंडळ सदस्यता धोक्यात आली आहे. मात्र शिक्षा झाल्यानंतर माणिकराव कोकाटे यांनी त्यांच्या वकिलामार्फत जामिनासाठी केलेला अर्ज दाखल केला आणि त्यांना जामीन मिळाला. यानंतर आता ते न्यायालयाने दिलेल्या शिक्षेच्या निकालाविरोधात माणिकराव कोकाटे उच्च न्यायालयात दाद मागणार आहेत. मात्र माणिकराव कोकाटे यांच्या अडचणीत आणखी एक वाढ झाली आहे. त्यांचा बंदुकीचा परवाना रद्द होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.



## संपादकीय ......

# यूट्यूबर रणवीरला 'सुप्रीम'ची चपराक

यूट्यूबर रणवीर अलाहाबादिया प्रकरणाने गेल्या काही दिवसांपासून सोशल मीडियावरील वातावरण चांगलेच ढवळून निघाले आहे. समाजमाध्यमांवर व्यक्त होण्याचा देशातील लोकशाही प्रणालीमध्ये प्रत्येकालाच घटनात्मक अधिकार मिळालेला आहे. व्यक्त होण्याचा अधिकार हा अभिव्यक्तीचा एक प्रकार असला तरी त्या व्यक्त होण्याला एक मर्यादा असतात. व्यक्त होत असताना स्वत:ची भूमिका मांडण्याला प्राधान्य देताना इतरांच्या भावना दुखावल्या जातील, समाजजीवनामध्ये जातीय अथवा धार्मिक तेढ निर्माण होईल, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल, अशा घटना घडणारच नाहीत, याची स्वत:हून प्रत्येकानेच खबरदारी घेणे आवश्यक आहे. हल्ली झटपट लोकप्रियता मिळविण्यासाठी सोशल मीडियाचा वापर करताना वादग्रस्त वक्तव्य करणे आणि प्रकरण अंगलट येत असल्याचे पाहिल्यावर दिलगिरी व्यक्त करणे, माफी मागणे असे प्रकार अलीकडच्या काळात सर्रासपणे घडू लागले आहेत.

मराठी चित्रपटसृष्टीमध्ये 'टकलू हैवान' ही भूमिका साकारल्याने त्याच नावाने ओळखले जाणारे राहुल सोलापूरकर यांनी देखील अलीकडच्या काळात एकदा नव्हे तर दोनदा वादग्रस्त वक्तव्ये केली होती. हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या आग्र्याहून सुटकेबाबत वादग्रस्त वक्तव्य करताना महाराष्ट्रीय जनतेची नाराजी ओढावून घेतली होती. शिवछत्रपतींनी औरंगजेबाच्या सरदारांना लाच देऊन आग्र्याहून पलायन केले होते, असा जावई शोध लावत राहुल सोलापूरकरांनी कोल्हेकुई केली होती. अर्थात या गोष्टींनी शिवछत्रपतींच्या इतिहासाला काहीही फरक पडत नाही; परंतु महाराजांच्या सुटकेला लाच देण्याचा संबंध लावल्याने राहुल सोलापूरकरांबाबत महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांत संताप व्यक्त केला गेला. सोलापूरकरांचे पुतळे देखील ठिकठिकाणी जाळण्यात आले. प्रकरण अंगलट येत असल्याचे व त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत असल्याचे पाहून राहुल सोलापूरकरांनी दिलगिरी व्यक्त करत महाराष्ट्रीय जनतेची माफी मागितली होती. सोलापूरकर प्रकरणांवर पडदा पडतो नाही तोच यूट्यूबर रणवीर अलाहाबादिया प्रकरणामुळे समाज जीवनात पुन्हा संतापाची लाट उसळली आहे. मुळात सवंग लोकप्रियता मिळविण्यासाठी वादग्रस्त वक्तव्ये करण्याच्या प्रकाराला आता कोठेतरी आळा हा बसलाच पाहिजे. उचलली जीभ, लावली टाळ्याला हे उद्योग आता खरोखरीच बंद झाले पाहिजेत. दिलगिरी व्यक्त करून प्रकरण मिटत असले तरी त्या वक्तव्यामुळे दुखावल्या गेलेल्या भावनांची, समाजजीवनात निर्माण झालेल्या कलहाची भरपाई होत नाही.

यूट्यूबर रणवीर अलाहाबादियाला सुप्रीम कोर्टाने व्यवस्थित भाषेत सुनावल्यामुळे आता अशा घटनांना निश्चितच पायबंद लागण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. 'इंडियाज गॉट लेटेंट' या शोमध्ये आई-वडिलांवर अश्लील टिप्पणी केल्या प्रकरणी यूट्यूबर रणवीर अलाहाबादियाच्या अडचणीत गेल्या काही दिवसांपासून वाढ होताना दिसत आहे. वेगवेगळ्या राज्यांमध्ये रणवीर विरोधात त्याच्या वादग्रस्त वक्तव्याबाबत गुन्हेही दाखल करण्यात आले आहेत. मुळातच या प्रकरणी यूट्यूबर रणवीर अलाहाबादिया आई-वडिलांबाबत वादग्रस्त वक्तव्य केल्यामुळे हे प्रकरण अधिकच चिघळले आहे. आई आपल्या गर्भाशयात नऊ महिने, नऊ दिवस बाळाला वाढविताना दररोज यातना सहन करत असते. बाळाला गर्भाशयात घेऊन दररोजची कामे करताना बाळाला कोणत्याही प्रकारची इजा होणार नाही याची ती क्षणाक्षणाला काळजी घेत असते. वडील मात्र जन्माला येणाऱ्या बाळाच्या खर्चाची व त्याच्या भविष्याची तरतूद करण्यासाठी जन्माला येण्या अगोदरपासून सोय करत असतात. बाळासाठी आपले आई-वडीलच आपले दैवत असतात. अशा देवतुल्य मातापित्यांबाबत वादग्रस्त वक्तव्य करण्याची हिंमत यूट्यूबर रणवीर अलाहाबादिया दाखवितोच कशी? ही वक्तव्ये खासगीत नाहीतर सार्वजनिक कार्यक्रमात व्यक्त करत असल्याने खऱ्या अर्थाने यूट्यूबर रणवीर अलाहाबादियाची जीभ छाटण्याचेच आदेश न्यायालयाने दिले पाहिजेत; परंतु आपल्या घटनेत तशी तरतूद नसल्याने अशा वाचाळवीरांचे आजतागायत फावले आहे. या वक्तव्याबाबत देशाच्या विविध भागांत संतापाची लाट उसळल्याने यूट्यूबर रणवीर अलाहाबादियाच्या विरोधात विविध राज्यांमध्ये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या तक्रारीरूपी एफआयआर रद्द करण्यासाठी रणवीरने उच्च न्यायालयाचा दरवाजा ठोठावला होता. पण उच्च न्यायालयात दिलासा न मिळता त्याच्या पदरी निराशा आली आहे.आम्हाला या जगातील एक व्यक्ती सांगा ज्याला हे आवडले आहे. तुम्हाला आतापर्यंत मिळालेल्या धमक्यांचा प्रश्न जिथे येतो तिथे कायदा काम करेल.

राज्य सरकार धमकी देणाऱ्यांवर कारवाई करेल. आपल्याकडे कायद्याचे पालन करणारी न्यायव्यवस्था आहे. रणवीरला चौकशीसाठी बोलावण्यात येईल. त्यासाठी त्याला हजर राहावे लागेल, अशा प्रकारचे ताशेरे ओढताना न्यायालयाने यूट्यूबर रणवीर अलाहाबादियाला समज देताना चांगलीच खरडपट्टी काढली आहे. रणवीरला मिळालेल्या धमक्यांची दखल घेताना सुप्रीम कोर्ट म्हणाले की, ज्या धमक्या देण्यात आल्या आहेत, त्यामधील भाषा ही तुमच्यापेक्षा नक्कीच चांगली आहे. किमान कोणालाही वाचल्यावर लाज वाटणार नाही. एकंदरीत रणवीरला सुप्रीम कोर्टानेही दयामाया न दाखविल्याने हे प्रकरण त्याच्यावर चांगलेच शेकणार असल्याचे चित्र निर्माण झाले आहे. ही सुरुवात कोठेतरी होणे आवश्यक होते. त्याशिवाय अशा वाचाळवीरांना पायबंद बसणार नाही.

विदर्भ प्रजासत्ताक

# डॉ. मुकुंदराव के .पवार शैक्षणिक संकुलामध्ये शिवजयंती महोत्सव

## वीर शिवबा वस्तीगृहात विविध कार्यक्रम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१ धामणगाव रेल्वे**

तालुक्यातील जुना धामणगाव येथे डॉ.मुकुंदराव के.पवार शैक्षणिक संकुल मध्ये शिवजयंती निमित्ताने वीर शिवबा वस्तीगृहात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.




या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव शिवाजीराव पवार हे होते.तर समन्वयक प्रा. जया केने, प्राचार्य मोहम्मदउज्जैनवाला,उप प्राचार्य दीप्ती हांडे उपस्थित होते .छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून व स्वर्गीय प्रमिलाताई पवार संस्थेच्या मातोश्री यांचे पुण्यस्मरण असल्याने त्यांच्या प्रतिमेला हार अर्पण पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले . छत्रपती शिवाजी महाराजांचा गीत गाऊन वानखडे सर सर्व त्यांची संच यांनी सादर केले. शिवनेरीवर शिवबा जन्मला या गीतावर शिवाजी महाराजांच्या जन्मापासूनच्या देखाव्याचे सादरीकरण करण्यात आले. काजल मून यांनी राजमाता जिजाऊ यांची भूमिका साकारली होती. बाल शिवबाची भूमिका सागर बोदुलवार या विद्यार्थ्याने साकारलेली होती.नयन रम्य देखाव्याने प्रेक्षकांचे डोळे पाणवले. स्नेहश्री ,वंश व्यवहारे, प्रथम खाडे, मयूर काकडे, अंशुमन काकडे, महेश मते, श्रेयांस राठोड , क्रिश शिंदे ,दर्शन बनसोड या विद्यार्थ्यांनी शिवाजी महाराजांच्या चरित्रावर भाषणे केली.शाळेतील शिक्षक महेश धांदे ,हनुमंत ठाकरे,संजय मसराम,अक्षय बोंद्रे यांनी शिवचरित्रावर सविस्तर मार्गदर्शन केले यावेळी विद्यार्थ्यांमध्ये शिवगर्जना करण्यात आली त्यामध्ये मेहुल शेंडे ,परिधी देशमुख , प्रसाद जुनघरे, महेश धांदे अक्षय बोंदरे यांनी केली. यावेळी विद्यार्थिनींनी शिवाजी महाराजांवर गाणी , नृत्य सादर केले त्यामध्ये ऋतुराज धुर्वे व क्रिश लोखंडे सागर व्यवहारे आनंद वैद्य , प्रियांशु बिस्मोरे, आरोही देवकर ,निधी ,आराध्या गाडेकर, संध्या जांभेकर, जानवी पटोरकर, कीर्ती अधिकार, किशोरी धांडे या विद्यार्थ्यांनी झुलवा पाळणा बाळ शिवाजीचा गाण्यावर सुंदर असे नृत्य केले. अंशुमन चौधरी यांनी शिवाजी महाराजांच्या जीवनावर पोवाडा सादर केला. कार्यक्रमाच्या शेवटी संस्थेच्या मातोश्री स्वर्गीय प्रमिलाताई पवार यांना वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे भजन भजन गाऊन श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अर्चना तापडिया व हनुमंत ठाकरे यांनी केले.तर आभार मंजुषा विलायत कर यांनी मानले. या कार्यक्रमाला संकुलातील सर्व शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लाडक्या बहिणींना मिळणार विमा सखीतून रोजगार कसा ते जाणून घ्या सविस्तर

**दि.२१विदर्भ प्रजासत्ताक**

'विमा सखी योजने'च्या माध्यमातून ग्रामीण भागातील महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र होण्याची आणि स्थिर करिअर घडवण्याची संधी मिळणार आहे. महिलांना अतिरिक्त उत्पन्न मिळाले तर त्या कुटुंबाला आर्थिक हातभार लावू शकतील. या योजनेअंतर्गत महिलांना ङखउ एजंट बनण्याचे प्रशिक्षण दिले जाणार आहे.

**काय आहे ही योजना-** मा सखी योजनेत सहभागी होणाऱ्या महिलांना पॉलिसी विक्रीतून मिळणाऱ्या कमिशनव्यतिरिक्त सुरुवातीच्या तीन वर्षांसाठी निश्चित स्टायपेंड दिला जाणार आहे.







महिलांचे अंदाजे मासिक उत्पन्न ७ हजार रुपयांपासून सुरू होईल.

महिलांना पहिल्या वर्षात प्रत्येक महिन्याला ७ हजार रुपये मिळतील.

दुसऱ्या वर्षी मासिक पगार ६ हजार रुपये होईल.

तिसऱ्या वर्षापर्यंत ही रक्कम ५ हजार रुपयांपर्यंत येईल. ज्या महिला विक्रीचे टार्गेट (ढरीसर्शी) पूर्ण करतील किंवा त्यापेक्षा जास्त करतील, त्यांना अतिरिक्त कमिशन आणि प्रोत्साहन भत्ता दिला जाईल.

**विमा सखीचे काम काय?**

या योजनेअंतर्गत विमा एजंट (खप- ींीरपलश -सशपीं) बनून या सखी लोकांमध्ये सर्वांसाठी विमा अभियान पसरवून कुटुंबांना सामाजिक सुरक्षा प्रदान करतील. या संदर्भात त्यांना प्रशिक्षण दिले जाणार आहे.

**कसे मिळेल मासिक वेतन आणि काय करावे लागेल?** पहिल्या वर्षी तुम्हाला २४ लोकांचा विमा काढावा लागेल आणि पहिल्या वर्षी किमान ४८ हजार रुपये कमिशन (बोनस कमिशन वगळून) मिळवावे लागेल. पहिल्या वर्षी तुम्हाला दरमहा ७ हजार रुपये स्टायपेंड मिळेल.

दुसऱ्या वर्षी स्टायपेंड ६ हजार रुपये असेल पण, यासाठी पहिल्या वर्षी घेतलेल्या किमान ६५% पॉलिसी दुसऱ्या वर्षाच्या शेवटपर्यंत लागू राहणे आवश्यक आहे. तिसऱ्या वर्षी तुम्हाला ५ हजार रुपये स्टायपेंड मिळेल, ज्यासाठी दुसऱ्या वर्षी घेतलेल्या किमान ६५% पॉलिसी तिसऱ्या वर्षाच्या अखेरीपर्यंत सक्रिय राहणे आवश्यक आहे.

**या योजनेसाठी पात्रता आणि शर्ती काय?**- विमा सखी होण्यासाठी तुमचे वय १८ वर्षे किंवा त्याहून अधिक असणे आवश्यक आहे. तसेच महिलांनी दहावी उत्तीर्ण केलेले असावे.

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष





अर्ज करण्यासाठी तुम्ही तुमच्या जवळच्या ङखउ शाखेला भेट देऊ शकता आणि माहिती घेऊ शकता.

तुम्ही अधिकृत वेबसाइटला भेट देऊन देखील अर्ज करू शकता. या योजनेत अर्ज करण्यासाठी आवश्यक कागदपत्रे जमा करावीत.यामध्ये दोन नवीन पासपोर्ट आकाराचे फोटो, वयाचा पुरावा, पत्त्याचा पुरावा आणि दहावी उत्तीर्ण प्रमाणपत्राची स्व-साक्षांकित प्रत जोडावी लागेल. तसेच, बँक खात्याचा तपशील सादर करावा लागेल.

**ऑनलाइन अर्ज कसा करावा?**

सखींनी त्यांचे अर्ज ऑनलाइन सबमिट करू शकतात. नावनोंदणी तपशील आणि अर्जाचा फॉर्म ङखउ च्या अधिकृत वेबसाइटवर उपलब्ध आहे.अर्ज करण्यासाठी या लिंकवर जाऊन क्लिक करा https://agencycareer.li







cindia .in/agtšreq/NewšLeadš SakhišCandidatešDatašentryšForšNewWeb.php

एका वर्षाच्या आत १ लाख विमा सखींना पॅनेलमध्ये समाविष्ट करणे हे या विमा सखी योजनेचे उद्दिष्ट आहे. ग्रामीण महिलांना विमा एजंट बनवून त्यांना स्वत: च्या पायावर उभे करण्यासाठी आणि ग्रामीण भागात विम्याबद्दल जागरूकता वाढवण्यासाठी ही खास योजना आणण्यात आली आहे. ङखउ विमा सखी योजनेमुळे फक्त ग्रामीण भागातच नाही, तर दुर्गम भागातील महिलांसाठी उपजीविकेच्या नवीन संधी निर्माण होणार आहेत.





# मनुक्याचं पाणी ४ आजारांवर बहुगुणी; रक्तदाब- त्वचेचे विकारही राहतील नियंत्रणात, पाहा रोज पिण्याचे फायदे

**दि.२१विदर्भ प्रजासत्ताक**

मनुक्याचं पाणी ४ आजारांवर बहुगुणी; रक्तदाब- त्वचेचे विकारही राहतील नियंत्रणात, पाहा रोज पिण्याचे फायदेसुका मेवा म्हटलं की, अनेकजण आवडीने खातात. पदार्थाची चव वाढवण्यासाठी मनुके फायदेशीर आहे. यामध्ये पचन, हृदयाचे आरोग्य, मधुमेहाचा वाढता धोका आणि तोंडाचे आरोग्य सुधारण्याची क्षमता आहे. मनुक्यामध्ये भरपूर पोषक तत्व आणि अँटी- ऑक्सिडंट्स असतात याचे सेवन केल्यानं शरीराला एक नाही तर अनेक फायदे होतात.


रात्रभर पाण्यात ४ ते ५ मनुके भिजत घालून दुसऱ्या दिवशी याचे पाणी प्यायल्यानं शरीराला अनेक फायदे मिळतील. नियमितपणे भिजवलेल्या मनुक्याचे पाणी प्यायल्याने वजन कमी होते, तसेच बॉडी डिटॉक्सिफाय होऊन आरोग्य सुधारते. भिजवलेले मनुके खाण्याचे आणि त्याचे पाणी प्यायल्यानं काय होते जाणून घेऊया.

जेव्हा शरीरात विषारी पदार्थ असतात. तेव्हा आरोग्याच्या अनेक समस्या उद्भवतात. त्यामुळे विषारी घाणेरडे पदार्थ काढून टाकण्यासाठी मनुका शरारीराला डिटॉक्सिफाय करतो.

२. रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करण्यासाठी जर आपली रोगप्रतिकारक शक्ती कमकुवत असेल तर आपण सारखे आजारी पडत राहू.

सर्दी, खोकला किंवा बदलत्या वातावरणाचा आपल्यावर लगेच परिणाम होतो. अशावेळी भिजवलेले मनुके खाल्ल्याने व्हिटॅमिन सी आणि बी कॉम्प्लेक्स मिळतो. ज्यामुळे रोगप्रतिकारक शक्ती मजबूत होते. शरीराला अनेक संसर्गाशी चांगल्या प्रकारे लढण्यास सक्षम करते.

मनुक्यात भरपूर प्रमाणात लोह असते. भिजवलेले मनुके खाल्ल्याने शरीराला मुबलक प्रमाणात लोह मिळते. यामुळे लाल रक्तपेशी वाढून अशक्तपणा दूर होतो.



३. त्वचेच्या समस्या

भिजवलेले मुनके किंवा त्याचे पाणी प्यायल्यानं त्वचेच्या समस्या दूर होतात.

भिजवलेल्या मनुक्यांमध्ये असणारे अँटी-ऑक्सिडंट्स त्वचेला मुक्त रॅडिकल्समुळे होणाऱ्या नुकसानापासून वाचवतात.

तसेच व्हिटॅमिन ए आणि ई देखील असते. जे त्वचेच्या आरोग्यासाठी चांगले आहे. यामुळे अकाली वृद्धत्व येण्याची क्षमता कमी करते.

**४. मनुक्याचे पाणी किंवा खाण्याचे इतर फायदे** - हाडे मजबूत करण्यासाठी भिजवलेले मनुके किंवा त्याचे पाणी पिऊ शकता. यामुळे हाडांना कॅल्शियम मिळतं


मनुक्याचे पाणी प्यायल्यानं पचनसंस्था सुरळीत होते. तसेच चावून खाल्ल्याने रक्तदाब कमी होतो. शरीराला फायबर आणि पोटॅशियम चांगल्या प्रकारे मिळतं. यामुळे हृदयाचे आरोग्य चांगले राहाते. यात असणारे फायबर पंचनसंस्थेसाठी चांगले आहे.

# महाराष्ट्र एसटी कामगार संघटनेने साजरा केला शिवजन्मोत्सव

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती** महाराष्ट्र एसटी कामगार संघटना अमरावती विभाग च्या वतीने १९ फेब्रुवारी २०२५ रोजी महाराष्ट्र एसटी कामगार संघटना, अमरावती विभागीय सचिव मोहितभाऊ देशमुखयां च्या मार्गदर्शनात प्रथमच शिव जन्मोत्सव सोहळा अमरावती आगार क्र १ मध्ये मोठ्या थाटात आणि जल्लोषात साजरा करण्यात आला.या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे स्वप्नील धनाड साहेब यंत्र अभियंता (चा ) रा. प. अमरावती, योगेश ठाकरे विभागीय वाहतूक अधिकारी, अमरावती,पवन देशमूख साहेबआगार व्यवस्थापक, अमरावती १ आगार.



बाळासाहेब टेटू साहेबसहाय्यक वाहतूक अधीक्षक,अमरावती १श्रीकांत देवरे साहेब, वाहतूक निरीक्षक, परतवाडा, सुरज थेटे साहेब, वाहतूक निरीक्षक,अमरावती,नगरसेवक



प्रदिप हिवसेयांच्या उपस्थितीत श्रींची महाआरती व प्रवाशी बांधवाना मसाला खिचडी व लाडूचे वाटप करण्यात आले. शिव जयंती कार्यक्रमात अत्यंत उत्स्फूर्त असा प्रतिसाद सर्व रा. प. कर्मचारी बंधू भगिनींनी दिला. यावेळी अमरावती आगार क्र १ मधील असंख्य रा. प. अधिकारी, कर्मचारी बंधू भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विदर्भ प्रजासत्ताक

शुक्रवार दि. २१ फेब्रुवारी २०२५ शहर/ग्रामिण


# देऊरवाडा येथे जमिनीच्या आत सापडले पुरातन शिव मंदिर

## सापडलेले पुरातन मंदिर भानू तीर्थ असल्याचे परिसरात चर्चा




विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२१चांदूर बाजार –** तालुक्यातील श्री क्षेत्र देऊरवाडा येथे पूर्णा व मेगा नदीच्या संगमाजवळ, पूर्णा नदीच्या काठी शेकडो वर्षांपूर्वीचे पुरातन शिवमंदिर जमिनीत आढळून आले. देऊरवाडा हे गाव पुरातन व धार्मिक तीर्थक्षेत्र आहे या ठिकाणी पुरातन नृसिंह मंदिर देखील आहे.नृसिंहाने हिरण्यकश्यपु राक्षचाचा वध केल्यानंतर आपली रक्ताने माखलेली नखे पयोष्णी नदीमध्ये या ठिकाणी साफ झाली होती. शिवपुराणातील पयोष्णी नदीचे वर्णन करण्यात आले आहे. पूर्णा नदी म्हणजेच वैष्णवी नदी होय. या ठिकाणी पूर्णा नदी ही उत्तरवाणी असून या भागात १८ तीर्थ आहे. या १८ तीर्थाचे वर्णन पष्णवी ग्रंथामध्ये करण्यात आले. यात सोमतीर्थ, क्रोड तीर्थ, प्रवरतीर्थ, अमृत तीर्थ, गरुड तीर्थ, विशाल तीर्थ, लक्ष्मी तीर्थ, कपाल मोहन तीर्थ, अग्नी तीर्थ, पिशाच तीर्थ, भानू तीर्थ,कुत शौच महातीर्थ, बागेश्वरी तीर्थ, चक्र तीर्थ ,पितृ तीर्थ, कच तीर्थ, रुद्र तीर्थ ,उमातीर्थ असे १८ तीर्थ आहे. या १८ तीर्थापैकी, पूर्णा नदीच्या काठी सापडलेले पुरातन मंदिर भानू तीर्थ असल्याचे म्हटले जाते. हे मंदिर नृसिंह मंदिराच्या मागील मुस्लिम समाजाचे मो.अस्लम,शे आजम यांच्या शेतात सापडले आहे. हे मंदिर नदीकाठी जमिनीच्या आत असुन चुना, दगड, खरब आधी साहित्यांनी बांधण्यात आले आहे. वरून त्या मंदिरावर स्लॅप सारखे दिसून येते व मंदिराच्या आत मध्ये शंकराचे जुनी शिवलिंग आढळून आले. या मंदिराच्या दरवाज्याची कमान पूर्व दिशेला आहे. त्याचप्रमाणे वाळू दगडाने एक मूर्ती देखील मिळाली आहे. हे मंदिर पूर्णा नदीकाठी असल्याने पूर्वी , पूर्णा नदीला येत असलेल्या महापुराच्या गाळामुळे दाबून गेले असल्याचीही चर्चा गावकऱ्यांमधून व्यक्त होत होती. या गावामध्ये अनेक मंदिरे असल्याने या गावाला देवाचा वाडा असेही म्हणतात. अशा या गावाचा धार्मिक पर्यटन म्हणून विकास होणे गरजेचे झाले असल्याचेही बोलले जात आहे.

जुन्या पष्णवी ग्रंथामध्ये, १६ अध्यायामध्ये या तीर्थाचे वर्णन केले आहे. त्यामुळे गावकऱ्यांमध्ये भरपूर दिवसापासून कुजबूज सुरू होती. अखेर गावातील काही युवकांनी पुढाकार घेत, जुन्या लोकांना विचारपूस करीत, त्यांचा सल्ला घेत व त्यानुसार शेतमालकाला भेटून, शेतमालकाची परवानगी घेऊन अखेर आज श्रमदान करून, जमिनीच्या आत असलेले मंदिर अखेर उघडे पाडले.!

# कौंडण्यपूर बॅरेजचे लाभक्षेत्र नदीजोड प्रकल्पात सामिल होणार

## निवेदिता चौधरी यांची मागणी



विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२१अमरावती–** सन २०११ पासुन कौंडण्यपूर बॅरेजचा प्रश्न प्रलंबित असल्याने हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी भाजपाच्या प्रदेश कार्यकारीणी सदस्य निवेदिता चौधरी यांनी पालकमंत्री चंद्रशेखर बावनखुळे व जलसंपदामंत्री गिरिष महाजन यांची भेट घेतली आहे.

वर्धा खोऱ्यामध्ये पाण्याची उपलब्धता नसल्याने कौंडण्यपूर बॅरेजचा प्रकल्प अहवाल २०११ पासुन शासन दरबारी प्रलंबित आहे. परंतु वर्धा खोऱ्यामध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने आता वैनगंगा पैनगंगा नदीजोड प्रकल्पाअंतर्गत पाणी सोडण्यात येणार असल्याने या खोऱ्यामध्ये पाण्याची उपलब्धता झाल्यावर पाणी कौडण्यपूर बॅरेजमध्ये सोडणे शक्य होणार आहे.कौडण्यपूर बॅरेजच्या लाभक्षेत्रातुन वऱ्हा,धोत्रा, मालधूर,माळेगाव,सालोरा,मार्डी यासह अनेक शिवारातील सिंचन क्षेत्रात वाढ होवून शेतकऱ्यांना लाभ होणार आहे. वैणगंगा पैनगंगा नदीजोड प्रकल्प पुर्ण व्हावा यासाठी निवेदिता चौधरी यांनी सतत १० वर्ष पाठपुरावा केला होता. कौंडण्यपूर बॅरेजचा प्रकल्प अहवाल तयार असुन तांत्रिक व प्रशासकीय मान्यता झाल्याबरोबर प्रकल्पाचे काम सुरु होण्यास मदत होणार आहे.

**कौंडण्यपूर बॅरेज प्रकल्प मार्गी लावण्यासाठी लवकरच बैठक–** मुख्यमंत्री देवेंद्र फडणविस यांच्या निदर्शनास कौंडण्यपूर बॅरेजचा विषय आणुन दिला आहे याबाबत ते सकारात्मक आहे.अमरावतीचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे व जलसंपदामंत्री गिरिष महाजन यांच्याकडे याबाबत मागणी केली असुन पालकमंत्री बावनकुळे यांनी याबाबत विदर्भ सिंचन महामंळाच्या मुख्यालयात बैठक आयोजित करण्याबाबत अधिकऱ्यांना सुचना दिलेल्या आहे अशी माहिती निवेदिता चौधरी यांनी दिली आहे. हा प्रकल्प मंजूर झाल्यावर हजारो हेक्टर जमिन सिंचना खाली येणार असुन शेतकऱ्यांना आत्हत्येच्या दुष्टचक्रातुन बाहेर काढण्यास मदत होणार आहे.

# १,६३,४३६ विद्यार्थी देणार आजपासून दहावीची परीक्षा

## अमरावती विभागात ७२१ परीक्षा केंद्रांची व्यवस्था

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२१अमरावती–** राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने शुक्रवार, २१ फेब्रुवारीपासून दहावीची परीक्षा घेण्यात येत आहे. अमरावती कार्यालयांतर्गत १ लाख ६३ हजार ४३६ विद्यार्थी ही परीक्षा देणार आहेत. त्यासाठी ७२१ परीक्षा केंद्रांची व्यवस्था केली आहे. अमरावती विभागात सर्वाधिक १९६ परीक्षा केंद्र अमरावती जिल्ह्यात असून, या केंद्रांवरून ३८ हजार २२१ विद्यार्थी परीक्षा देतील. तर बुलडाणा जिल्ह्यातील विद्यार्थ्यांची संख्या याहून जास्त ४० हजार १९४ असून त्यांच्यासाठी १५९ परीक्षा केंद्रांचीव्यवस्था करण्यात आली आहे. अकोला जिल्ह्यासाठी ११९ परीक्षा केंद्र असून तेथील विद्यार्थी संख्या २५ हजार ८५७ आहे. त्याचवेळी यवतमाळ जिल्ह्यातील १५९ परीक्षा केंद्रांवरून ३८९८५ विद्यार्थी ही परीक्षा देणार असून, वाशीम जिल्ह्यातील २०१७९ विद्यार्थी विविध ८० केंद्रांवरून यापरीक्षेला बसणार आहेत.शिक्षण उपसंचालक नीलिमा टाके यांच्या नेतृत्वात मंडळाचे अध्यक्ष डॉ. साबळे, सचिव तसेच सहसचिव तेजराव काळे यांनी या परीक्षेची संपूर्ण पूर्ण केली. या परीक्षेच्या सुयोग्य संचालनासाठी अमरावती विभागात एकूण ७३ परीरक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे.

# अस्वलीचा शेतकऱ्यावर जीवघेणा हल्ला

## चौराकुंड परीक्षेत्रातील घटना, गंभीर जखमी अमरावती रेफर



विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२१अमरावती –** धारणी शहरातच्या लगतच्या भागात गेल्या दोन दिवसांपासून अस्वलीच्या जोडप्याचा संचार असल्याने आधीच नागरिकांसह शेतकरी दहशतीत होते. अशातच अस्वलीन शेतात काम करणाऱ्या आदिवासी शेतकऱ्यावर हल्ला करून त्याला गंभीर जखमी केले. जखमीची प्रकृती गंभीर असल्याने त्याला अमरावती रेफर करण्यात आले.

सखाराम सेलुकर (५०) रा. चोपन असे जखमीचे नाव आहे. माहितीनुसार, धारणी शहरा लगतच्या परिसरात गेल्या काही दिवसांपासून अस्वलीचा संचार असल्याने आधीच नागरिक दहशतीत होते. वनविभागाच्या पथकाने अस्वलीला पकडून जंगलातील नैसर्गिक अधिवासात सोडण्यासाठी ज्या ज्या ठिकाणी अस्वलाचे पगमार्क भेटले त्या ठिकाणी ट्रॅप कॅमेरे व पिंजरे सुध्दा लावले होते. परंतु, वनविभागाने शर्थीचे प्रयत्न केल्यानंतरही अस्वल ट्रॅपमध्ये अडकले नाही. उलट अस्वलाचे शेतात कामकरणाऱ्या सखराम सेलुकरवर हल्ला करून त्याला गंभीर जखमी केले. धारणीपासून ४० किमी अंतरावरील चौराकुंड वनपरिक्षेत्रातील शेतकरी सखाराम सेलुकर हा शेतात असताना १९ फेब्रुवारी रोजी अस्वलीनेत्याच्यावर हल्ला केला. सखरामला तातडीने हरीसाल प्राथमिक आरोग्य केंद्रात भरती करण्यात आले. तेथून धारणी उपजिल्हा रूग्णालयात पाठविण्यात आले. परंतु, सखारामची प्रकृती चिंताजनक असल्याने त्याला अमरातवी रेफर करण्यात आले. याबाबत वनविभागातील अधिकारी, कर्मचाऱ्यांना माहिती देण्याचा प्रयत्न केला असता संपर्क होऊ शकला नाही. सखारामच्या कमरेखाली अस्वलीने लचका तोडल्याने प्रचंड रक्तस्त्राव झाला होता. या घटनेमुळे चौराकुंड, चौपन, खोकनार गावातील आदिवासींमध्ये प्रचंड दहशत निर्माण झाली आहे.

# जिल्ह्यात ८४१ ग्रामपंचायतींमध्ये उद्या गृहोत्सव

## ३२ हजार घरकुल लाभार्थ्यांना एकाचवेळी पहीला हप्ता मंजुरीपत्र वितरण

### .. राज्य, जिल्हा, तालुका व गावपातळीवर थेट प्रक्षेपण

### झेडपी सीईओ संजिता महापात्र यांची माहिती





विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२१अमरावती–** प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) टप्पा २ अंतर्गत शनिवार २२ फेब्रुवारीला राज्यात २० लाख तर जिल्ह्यात ३२ हजार लाभार्थ्यांना मंजुरीपत्र व पहिल्या हप्त्याचेवितरणशनिवार २२ फेब्रुवारी रोजी एकाचवेळी केले जाणार आहे. पुणे येथे आयोजित या राज्यस्तरीय कार्यक्रमाला केंद्रीयगृहमंत्री अमित शहा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व दोन्ही उपमुख्यमंत्री यांची उपस्थिती राहणार आहे. याचे गावपाळीवर थेट प्रक्षेपण केले जाणार आहे. जिल्ह्यात ८४१ ग्रामपंचायतींमध्ये हा गृहोत्सव साजरा केल्या जात आहे. अशी माहीती सीईओ संजिता महापात्र यांनी दिली.

राज्यात ग्रामीण गृह निर्माण योजनेसाठी १०० दिवसीय कार्यक्रम दिला आहे. याअंतर्गत महाराष्ट्रात एकाचवेळी प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा २ मधील लाभार्थ्यांना मंजूरीपत्र व पहिला हप्ता वितरणाचा कार्यक्रम २२ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ४.४५ वाजता होणार आहे. जिल्ह्यात सप्टेंबरमध्ये २४ हजार तर काहीदिवसांपुर्वी ३२ हजार घरकुलांचे उद्दिष्ट प्राप्त झाले आहे. त्यामुळे या सर्व लाभार्थ्यांच्या खात्यात प्रत्यकी १५ हजार प्रमाणे ४८ कोटींचा पहीला हप्ता थेट खात्यात जमा होणार आहे. ग्रामपंचायत स्तरावर लाभार्थ्यांच्या मंजूरीपत्र वितरण व हप्ता वितरण कार्यक्रमाच्या दिवशी ग्रामसभेचे आयोजन करण्यात येणार आहे. प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये सर्व लाभार्थी परिवारासह व ग्रामस्थांनी उपस्थित राहणार आहे. तसेच ग्रामपातळीवरील सरपंचउपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामपंचायत अधिकारी, तलाठी, कृषी सहाय्यक, मुख्याध्यापक, शिक्षक, अंगणवाडी सेविका यांचे बरोबर संबधित लाभार्थी व त्यांचे कुटूंब यांच्या उपस्थितीचे नियोजन करण्यात आले आहे.

ग्रामपंचायत स्तरावर मंजूरीपत्र वितरण व हप्ता वितरण कार्यक्रमाच्या ठिकाणी स्क्रिन व एलसीडी प्रोजेक्टरची व्यवस्था असणार आहे. जेणे करुन संपूर्ण लाभार्थ्यांना व ग्रामस्थाना कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण पाहता येईल. ८४१ ग्रामपंचायतस्तरा वर ग्रामसभा घेऊन व्हिडीओ कॉन्सरन्सद्वारे गृहोत्सावाचा कार्यक्रम प्रसारित करण्यात येणार आहे. अशी माहीती सीईओ संजिता महापात्र यांनी दिली.

**नागरिकांच्या उपस्थितीत सोहळा–** जिल्हास्तरावर ५०० तर तालुकास्तरावर ३०० नागरीकांच्या उपस्थितीत सोहळा आयोजित केले आहे. ग्रामपंचायतींसह तालुका स्तरावर १४ पंचायत समित्यांमध्ये आमदारांच्या अध्यक्षतेखाली ३०० लाभार्थ्यांच्या उपस्थिती मध्ये कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. सदर कार्यक्रमामध्ये लाभार्थ्यांनाप्रशिक्षण व मंजूरी पत्र वितरीत करण्यात येणार आहे. जिल्हास्तरावर पालकमंत्री यांचे यांचे अध्यक्षतेखाली ५०० लाभार्थ्यांच्या उपस्थिती मध्ये कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेलेआहे .

### ग्रामपंचायतस्तरावर निरिक्षकांची नेमणूक

प्रत्येक ग्रामपंचायतीला निरिक्षकाची नेमणुक करण्यात आलेली आहे. निरिक्षक हे ग्रामपंचायतस्तरावर सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामपंचायत अधिकारी, तलाठी, कृषिसहाय्यक, मुख्याध्यापक, शिक्षक, अंगणवाडी सेविका यांचे बरोबर लाभार्थी व त्यांचे कुटूंब यांच्या उपस्थितीचे नियोजन करणार आहे. ग्रामपंचायत स्तरावर ८०१० फुट साईजचा फ्लेक्स बोर्ड लावण्यात येत आहेत. त्यामध्ये प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा २ अंतर्गत मंजूर लाभार्थ्यांची नावे नमुद करण्यात येणार आहे.

# पुर्व झोन क्र.३ अंतर्गत छत्री तलाव परिसरात विशेष स्वच्छता मोहीम

## महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांची उपस्थिती



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२१अमरावती –** महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, सहाय्यक आयुक्त दिप्ती गायकवाड व वैद्यकीय अधिकारी डॉ.अजय जाधव यांच्या विशेष उपस्थितीत आज दिनांक २०/०२/२०२५ रोजी पुर्व झोन क्र.३ दस्तुरनगर प्रभाग क्र.९ डठझक्र वडाळी मध्ये विशेष स्वच्छता मोहीम अंतर्गत मनपा स्थायी सफाई कामगार व कंत्राटी सफाई कामगार यांच्या मार्फत संयुक्तरित्या छत्री तलाव परिसरात विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. सदर मोहीम अंतर्गत परिसरातील झाडू साफ़ सफाई, गवत काढणे, तलावातील काटवरील गाळ काढणे, प्लास्टिक, कचरा उचलणे इत्यादी काम करण्यात आले.सदर मोहीममध्ये महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, सहाय्यक आयुक्त दिप्ती गायकवाड व वैद्यकीय अधिकारी डॉ.अजय जाधव यांनी स्वतः श्रमदान केले.

यावेळी स्वच्छ भारत अभियान शहर समन्वयक डॉ.श्वेता बोके, ज्येष्ठ स्वास्थ निरीक्षक कुंदन हडाले, स्वास्थ निरीक्षक मनीष हडाले, योगेश कंडारे, संजय माहुरकर, मिथुन वाघमारे, मनिष नकवाल, मोहित जाधव, धर्मेंद्र ढिके, प्रसाद कुळकर्णी व वरिष्ठ लिपिक प्रल्हाद चव्हाण, बिटप्यून, मनपा स्थायी व कंत्राटी सफाई कामगार तसेच सुपरवाइजर उपस्थित होते.

# बारा मीटर रुंदीच्या आतील रस्त्यांवरील इमारतींची उंची आता ३६ मीटरपर्यंत

## पुनर्विकास रखडलेल्या सोसायट्यांना दिलासा, राज्याच्या नगरविकास विभागाचा निर्णय



विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२१अमरावती –** पुनर्विकास करू पाहणाऱ्या गृहनिर्माण सोसायट्यांना दोन वर्षानंतर राज्य सरकारकडून पुन्हा दिलासा मिळाला आहे. बारा मीटर रुंदीच्या आतील रस्त्यांवरील इमारतीना सध्या असलेली २४ मीटर उंचीची मर्यादा वाढवून ३६ मीटरपर्यंत करण्यात आली आहे. त्यामुळे उंचीमुळे पुनर्विकास रखडलेल्या सोसायट्यांचा विकासाचा मार्ग मोकळा झाला आहे. अमरावती शहराचा विचार केल्यास १५ मिटर, २४ मिटर आणि ७० मिटर उंचीच्या बिल्डींग अटीची व नियमांची पूर्ता करून इमारतींना परवानगी दिल्या जाते. अमरावतीत १५ मिटर, २४ मिटरउंचीच्या इमारती आहेत. मात्र ७० मिटर उंचीच्या इमारती नाहीत. राज्य सरकारच्या या निर्णयामुळे पुनर्विकास करू पाहणाऱ्या सोसायट्यांनाच ही सवलत लागू होणार असून २४ मीटरची मर्यादा आता ३६ मीटरपर्यंत झाली आहे.

राज्यातील महापालिका आणिबांधकाम नगरपालिकांमध्ये नियमावलीत एकसूत्रीपणा आणण्यासाठी डिसेंबर २०२० मध्ये राज्य सरकारने 'यूडीपीसीआर' (एकात्मिक बांधकाम विकास व प्रोत्साहनपर नियंत्रण)नियमावली लागू केली. या नियमावलीनुसार कलम १०.१.१ मध्ये बारा मीटरपर्यंत रुंदी असलेल्या रस्त्यांवर ३६ मीटर उंचीपर्यंत इमारती उभारण्यास परवानगी देण्यात आली आहे. विशेष म्हणजे ही नियमावली लागू होण्यापूर्वी ५ जानेवारी २०१७ मध्ये मंजूर करण्यात आलेल्या बांधकाम विकास नियंत्रण नियमावलीत शहरात बारा मीटर रुंदीच्या रस्त्यांवर ३६ मीटर उंचीपर्यंत इमारत बांधण्यास परवानगी देण्यात आली होती. त्यानुसार बांधकामपरवानगीदिल्या जात असे असताना त्या होत्या. नियमावलीत एक ओळटाकून ३१ डिसेंबर २०२२पर्यंतच ही तरतूद लागू असेल', अशी मेख नगरविकास खात्याकडून मारण्यात आली होती. तसेच, राज्य सरकार वाटेल तेव्हा या नियमात दुरुस्ती करून इमारतींच्या उंचीबाबतचा निर्णय घेऊ शकेल, असे त्यात म्हटले.इमारतींच्या उंचीवर मर्यादा आल्याने शहरातील बारा मीटर रुंदीच्या आतील रस्त्यांवरील जुन्या इमारतींचा पुनर्विकास रखडला होता.

अखेर दोन वर्षांनंतर नगरविकास विभागाला जाग आली.बारा मीटर रुंदीच्या आतील रस्त्यांवर २४ ऐवजी ३६ मीटर बांधकाम करण्यास उंचीपर्यंत बांधकाम करण्यास परवानगी देण्याची तरतूद शहरासाठी लागू करण्यात आली. मात्र, ती लागू करताना केवळ पुनर्विकास करू पाहणाऱ्या सोसायट्यांनाच ही सवलत लागू राहील. याबाबतचा आदेश नगररचना विभागाच्या सहसचिव डॉ. प्रतिभा भदाणे यांनी काढला आहे. त्यामुळे उंचीवरील ही मर्यादा काढताना पार्किंगसाठीची सहा मीटरची रुंदीं वगळण्यात आली. त्यामुळे मान्य 'एफएसआय' बरोबरच (चटई क्षेत्र निर्देशांक) टीडीआर प्रीमिअम एफएसआय फंजीबल एफएसआय वापरून पुनर्विकास करणे सोसायट्यांना शक्य होणार आहे.

### १२ मजली इमारत उभारणे शक्य

शासनाच्या नव्या निर्णयामुळे बारा मीटर रुंदीपर्यंतच्या रस्त्यांवर ३६ मीटर अधिक सहा मीटर पार्किंग असे ४२ मीटरपर्यंत बांधकाम करता येणार आहे. सर्वसाधारण तीन मीटर उंचीचा एक मजला असतो. त्यामुळे ११ ते १२ मजली इमारत उभारणे आता शक्य होणार आहे.–


# नांदगाव तालुक्यातील १२३ गावे अजूनही तहानलेलीच?

## गावांना 'हर घर जल'ची करावी लागतेय प्रतीक्षा, ४४ गावांमध्ये काम चालू, २० गावांमध्ये पोहोचले पाणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१नां.खंडेश्वर**

नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील ग्रामीण भागातील नागरिकांनाकेंद्र सरकारने जल जीवन मिशन योजना सुरु केली. मात्र नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील नागरिकांना ही योजना दिवास्वप्न ठरत आहे. ग्रामीण भागातील जनतेला नळ जोडणीच्या माध्यमातून शुध्द व स्वच्छ पाणी देण्यासाठी केंद्र सरकार यांनी जलजीवन मिशन योजना आणली. सन २०२४ पर्यंत ग्रामीण भागातील प्रत्येक घरात वैयक्तिक नळ जोडणीद्वारे किमान ५५ लिटर प्रतिदिन गुणवत्तापुर्ण पाणीपुरवठा करण्याचे जल जीवन मिशनचे मुख्य उदिष्ट आहे. नांदगाव खंडेश्वर तालुक्यात एकूण १२३ ग्रामपंचायती असुन ४४ गावांमध्येच योजनेचे काम चालू आहे.

त्यापैकी २० गावांना पाणी पोचल्याचे तसेच २४ गावांमध्ये ७० टक्के काम झाल्याचे संबंधित विभागाकडून सांगण्यात येत आहे. जलजीवन योजनेअंतर्गत कोट्यवधीची कामे टाकण्यात आले आहे. सन २०२१, २०२२ मध्ये निविदा प्रक्रीयाही पार पडली. सन २०२१,२०२२ पासून बहुतांश कामाला सुरवात झाली. काही कामांची निविदा नंतर होऊन कामाची संख्या वाढत गेली. मात्र अल्पावधीतच अनेक गावातून कामांच्या तक्रारी देखील वाढल्या कंत्राटदारांकडून कामात दिरंगाई होत असल्याचा आरोपही झाला. आधी २०२४ मध्ये पूर्ण होण्याचा कालावधी असतांना तालुक्यातील एकही योजना आजपर्यंत पूर्ण न झाल्याचे चित्र आहे. उन्हाळा लागण्यापूर्वी उर्वरित योजना पूर्ण करण्यासाठी प्रशासकीय



स्तरावरून योग्य ती पाऊले उचलण्याची गरज असताना ती का केली गेली नाहीत असा प्रश्न उपस्थित होत आहे. ग्रामीण पाणी पुरवठा विभागाकडून सातत्याने कामाची गती वाढविण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्टा करत असल्याचे सांगितले जात असले तरीही नांदगाव खंडेश्वर तालुक्यात जल जीवन मिशन योजनेची गती मात्र मंदावलेलीच असल्याचे दिसून येत आहे. जनहितासाठी गोरगरिबांसाठी शेतकऱ्यांसाठी शासन कोट्यावधी रुपये खर्च करून योजना सुरूकरत आहे या कोट्यावधी रुपयांचा शहर व ग्रामीण भागातील गोरगरिबांना फायदा झाला पाहिजे हा मूळ उद्देश शासनाचा आहे मात्र नांदगाव खंडेश्वर तालुक्यात जलजीवन योजनेचे जाणीवपूर्वक तीन तेरा वाजल्याचे दिसून येत आहे कामाचा दर्जा निकृष्ट दर्जाचे असून अनेक गावांमध्ये यायोजनेची कामे अर्धवट परिस्थितीत पडलेली आहे जलजीवन मिशन ही योजना ग्रामीण भागातील गोरगरिबांसाठी व सर्वच नागरिकांसाठी अतिशय चांगली योजना आहे शासनाचा हा उपक्रम अतिशय चांगला आहे. मात्र कंत्राटदाराच्या जाणीवपूर्वक दुर्लक्षमुळेकिवा आर्थिक कमाईचे माध्यमसमजूनही योजना नांदगाव खंडेश्वर तालुक्यात पूर्णपणे कोलमडल्याचे दिसून येत आहे अधिकारी कर्मचारी वर्ग सुद्धा पाहिजे त्याप्रमाणे कारवाई करताना दिसत नाही. बहुतांश ठिकाणी होत असलेल्या कामांच्या तक्रारीही संबंधित विभागाकडे करण्यात आल्या असल्यामुळे कामाचा दर्जा तपासण्याची मागणी होत असताना मात्र, चौकशी करणार कोण व चौकशी होणार कोणाची हा गंभीर स्वरूपाचा प्रश्न नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील जनतेला आहे. वरिष्ठ पातळीवर जलजीवन मिशनच्या कामाची पाहणी किवा चौकशी करून दर्जेदार कामे होण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे.

### २४ गावांमध्ये ७० टक्के काम पूर्ण

जलसंपदा विभागाच्या अभियंता सुधा रहागंडाळे यांना विचारले असता त्यांनी सांगितले की, आमच्या विभागाकडे ४४ गावांची प्रस्ताव आले असून २० गावांना पाणी पोहोचले आहे, त्यापैकी २४ गावांमध्ये ७० टक्के पर्यंत कामे झालेले असून उर्वरित काम चालू आहे.

**– सुधा रहागंडाळे, अभियंता जलसंपदा विभाग.**

# शिवाजी महाराज सर्वगुण संपन्न व विविध गुणांनी युक्त असलेले प्रेरणेचे अखंड स्त्रोत

## जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांचे प्रतिपादन, जिल्हा काँग्रेस कमिटी वतीने शिवजयंती साजरी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती–**

शिवाजी महाराज यांची बुद्धिमत्ता, जिज्ञासूवृत्ती, शौर्य, चातुर्य, युक्तिवाद, गुणज्ञता, निष्पक्षपाती बुद्धि, मित्र भाव ,उद्यमशीलता, कल्पकता, विवेकशक्ती, तेजस्विता व स्वाभिमान तसेच मातृपितृभक्ती बंधुप्रेम महिलांचा आदर निर्णयक्षमता मुत्सद्दीपणा अशी दूरदृष्टी लाभलेले राजे होते. त्यांच्या राज्यात कधीही जनतेवर अन्याय झाले नाही. आपल्या मुला बाळाप्रमाणे जनतेला त्यांनी प्रेम दिले अशा सर्वगुणसंपन्न व विविध गुणांनी युक्त असलेले प्रेरणेचे अखंड स्त्रोत म्हणजे शिवाजी महाराज असल्याचे प्रतिपादन जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांनी केले.

जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने काँग्रेसभवन येथे शिवजयंतीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व हारअर्पण जिल्हा अध्यक्ष बबलू देशमुख यांच्या हस्ते करण्यात



आले.याप्रसंगी जिल्हा अध्यक्ष बबलू देशमुख यांनी शिवाजी महाराजांच्या जीवनावर प्रकाश टाकला. ते म्हणाले, संपूर्ण विश्वात छत्रपती शिवाजी महाराजांसारखा लोककल्याण कारी सुराज्य निर्माण करणारा लोकसंग्रह आणि उत्कृष्ट प्रशासक असा राजा होणे आतातरी शक्य नाही त्यामुळे देश बांधवांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार अंगीकारावे. यावेळी काँग्रेस कार्यकर्त्यांनी जय जिजाऊ जय शिवराय शिवाजी महाराज की जय अशा गगनभेदी घोषना देत जयकार केला. यावेळी प्रकाशराव काळबांडे, रामेश्वरराव अभ्यंकर,बिट्टूभाऊ मंगरोळे, विठ्ठलराव सरडे, नंदकिशोर यादव,सिद्धार्थ बोबडे ,बबलु बोबडे,विनोदभाऊ पवार,अजय वसु,सागर देशमुख, बाबुरावजी देशमुख उपस्थित होते.

# मध्यवर्ती बसस्थानकावर दोन संशयीत महिला चोर ताब्यात

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२१अमरावती–** अज्ञात चोरट्यांकडून अनेक महिन्यापासून शहरातील तिन्ही बसस्थानकावर दर पंधरा दिवसाच्या अंतरावर महिला, वृध्दांचे सोने व नगदी चोरी करण्याच्या घटना होत आहे. परंतु, अद्याप पर्यंत पोलिसांना चोरट्यांचा साधा सुगावा देखील लागलानाही. अशातच आज २० फेब्रुवारी रोजी अमरावती बसस्थानकावर चौकीतील पोलिसांनी दोन संशयीत चार महिलांना ताब्यात घेतले. दोन्ही महिला रेकार्डवरच्या चोर असल्याने त्यांना चौकशीसाठी कोतवाली पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले असून महिलांच्या माध्यमातून बसस्थानकावर प्रवाशांचा ऐवज लुटण्याच्या अनेक घटना उघड होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

बसस्थानकावर महिला, पुरूषांचे सोने, दागिने किंवा इतर ऐवज चोरी होण्याच्या घटना नेहमी घडक्च असतात. परंतु, गेल्या सात महिन्यापासून साधारणतः १५ दिवस ते १ महिन्याच्या अंतरावर अमरावती मध्यवर्ती, राजापेठ व बडनेरा बसस्थानकावर महिलांचे दागिने लुटण्याच्या घटना परफेक्टर शेड्यूलनुसार घडत आहेत. सात महिन्यात घडलेल्या २७ घटनांमध्ये ३२ लाखा पेक्षा जास्तदागिनेवनगदीचाऐवजचोरी गेला आहे. परंतु, अद्याप पर्यंत पोलिसांना चोरट्यांचा साधा



सुगावा देखील लागला नाही. अशातच आज २० फेब्रुवारी रोजी अमरावती बसस्थानकावर चौकीतील पोलिसांनी दोन संशयीत चार महिलांना ताब्यात घेतले. दोन्ही महिला दुपारच्या सुमारास बसस्थानकाच्या आवारातील बेंचवर एका महिलेच्या जवळ बसल्या होत्या.दोन्ही महिलांनी त्या प्रवाशी महिलेच्या पर्सला हाथ लावण्याचा प्रयत्न केल्याने प्रवाशी महिलांनी आरडाओरड केल्याने गर्दी जमताच चौकीतील पोलिसांनी तात्काळ महिलांना ताब्यात घेतले.

# धार्मिक अल्पसंख्यांक बहुल शाळांमध्ये पायाभूत सोयी-सुविधांसाठी अनुदान योजना

## इच्छुकांकडून प्रस्ताव आमंत्रित

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२१अमरावती –** राज्य शासनाव्दारे धार्मिक अल्पसंख्यांक विद्यार्थी बहुल शासनमान्य खाजगी शाळा, कनिष्ठ महाविद्यालये, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नगरपालिका/नगरपरिषद शाळा, अपंग शाळा आदींना पायाभूत सोयी-सुविधा पुरविण्यासाठी अनुदान योजनेंतर्गत १० लाख अनुदान दिले जाते. या योजनेचा लाभ घेण्यासाठी इच्छुक शाळांनी विहित नमुन्यात अर्ज सादर करावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाव्दारे करण्यात आले आहे.

**योजनेच्या अटी व शती पुढीलप्रमाणे : –** शासन मान्यता प्राप्त खाजगी शाळा, कनिष्ठ महाविद्यालय, नगरपालिका, नगरपरिषद शाळा, औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये अल्पसंख्यांक समाजाचे (मुस्लिम, बौध्द ग्रिश्चन, जैन, शिख, पारशी व ज्यू मिळून)

किमान ७० विद्यार्थी शिकत असणे आवश्यक, अपंगाच्या शाळांमध्य किमान ५० टक्के अल्पसंख्यांक विद्यार्थी शिकत असणे आवश्यक, प्रत्येक शैक्षणिक संस्थेने ऊखएड उेवश. औद्योगिक प्रशिक्षण संस्थांनी खपीींळीींश उेवश तसेच अपंग शाळांनी ड्ळलशपलश उेवश देणे आवश्यक आहे.

१) शाळेच्या इमारतीय नूतनीकरण व डागडुजी २) ग्रंथालय अद्ययावत करणे ३) संगणक कक्ष उभारणे/अद्ययावतकरणे,४) शैक्षणिक कार्यासाठी आवश्यक फर्निचर ५) इनव्हर्टरची सुविधा निर्माण करणे,६) इंग्रजी लैंग्वेज लॅब. ७) शुद्ध पेयजलाची व्यवस्था करणे, ८) प्रयोगशाळा उभारणे/अद्ययावत करणे. ९) प्रसाधनगृह/स्वचछतागृह उभारणे/डागडुजी करणे१०) झेरॉक्स मशीन ११) संगणक हार्डवेअर/सॉफ्टवेअर १२)अध्ययनाची साधने (ङशरीपळपस चरींशीळरश्र/एल.सी.डी.प्रोजक्टर, अध्ययनासाठी लागणारे विविध सॉफ्टवेअर इत्यादी.इच्छूक शाळा, कनिष्ठ महाविद्यालय, औद्योगिक प्रशिक्षण संस्था व अपंग शाळांनी परिपूर्णरित्या



भरलेला अर्ज आवश्यक कागदपत्रासह प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन येथील नियोजन शाखेत दि. २२ फेब्रुवारी, २०२५ पर्यंत सादर करावा. विहित मुदतीनंतर प्राप्त झालेले प्रस्ताव ग्राह्य धरले जाणार नाहीत. शासन निर्णय व अर्जाचा नमूना हींींि:// ीवव.ारहरीरीहींीर.र्सीं.ळप या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.प्रस्ताव सादर करताना शासन निर्णय दि.७ ऑक्टो. २०२४ मध्ये नमूद करण्यात आलेल्या एकूण १२ सोई सुविधां पैकी इनव्हर्टर/जनरेटर सुविधा व शुध्द पेयजलाची व्यवस्था करणे या दोन पायाभूत सुविधांचे प्रस्ताव प्राथम्याने द्यावेत, असे जिल्हा नियोजन अधिकारी अभिजित मस्के यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

# रोहित्रामधील ऑईल, केबल चोरणाऱ्यासह विकत घेणाऱ्यास रंगेहात पकडले

## १४ गुन्ह्यांची दिली कबुली,स्थानिक गुन्हे शाखेची दबंग कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती–**

रोहित्रामधील ऑईल व केबल चोरणाऱ्या सराईत गुन्हेगाराला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अटक व चोरीच्या गुन्ह्यातील ८६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. चोरट्याने चोरीच्या तब्बल १४ गुन्ह्यांची कबुली दिली असून पोलीस त्याची कसून चौकशी करीत आहेत. अब्दुल इद्रीस अब्दुल शहीद (वय ४५ रा. खडकपुर, मुर्तीजापुर) आणि मोहम्मद सलीम मोहम्मद हमीद (रा. ताजनगर) अशी अटकेतील दोघांची नावे आहेत. ग्रामीण भागात रोहित्रामधील ऑईल व केबल तार चोरीच्या घटना सातत्याने वाढत आहे. मोर्शी, तिवसा, धामणगाव, चांदुर रेल्वे व नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील लोणी टाकळी, दहिगाव, स्टोन क्रेशर येथील कांडलकर यांच्या शेतातील डिपीमधील ४५० लिटर ऑईल व केबल चोरी झाल्याच्या घटना समोर आल्या आहेत.या घटनेत लोणी पोलिसांनी महावितरण विभागाचे सहायक अभियंता सुदाम गजानन पाकधाने (वय ३४) यांच्या तक्रारीवरून ६ जानेवारी २०२५ रोजी गुन्हा दाखल केला. स्थानीक गुन्हे शाखेचे पथक या प्रकरणात समांतर तपास करीत होते. दरम्यान स्थानीक गुन्हेशाखेच्या पथकातील अधिकाऱ्यांनी ऑईल चोरी करणाऱ्यांची माहिती घेतली असता अब्दुल इद्रीसने लोणी परिसरातील डिपीमधील ऑईल व केबल चोरी केले आणि चोरी केलेला मुद्देमाल ताजनगर

येथील भंगार विक्रेता मोहम्मद सलीम याला विकल्याची माहिती मिळाली. चोरी केलेल्या मालाचे पैसे घेण्याकरिता अब्दुल इद्रीस २० फेब्रुवारीला अमरावतीला येत असल्याची माहिती पथकाला मिळाली. पोलिसांनी ताजनगर परिसरात सापळा रचला. अब्दुल इद्रीस दुचाकीने ताजनगरात येताच पोलिसांनी त्याला व भंगार विक्रेता मोहम्मद सलीमला ताब्यात घेतले. दोघांची कसुन विचारपुस केली असता अब्दुल इद्रीस याने लोणीसह जिल्ह्यात १४ ठिकाणी चोरी केल्याचे सांगितले. पोलिसांनी दोघांना अटक करून लोणी पोलिसांच्या ताब्यात दिले. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरण वानखडे, पोलीस उपनिरीक्षक नितीन इंगोले, पोलीस कर्मचारी सुनील महात्मे, सैय्यद अजमत, सुधीर बावणे,निलेश डांगोरे, चेतन दुबे, हर्षद घुसे, सुरेश पवार, सागर धापड आणि शिवा शीरसाठ यांनी ही कारवाई केली.

# अज्ञात समाज कंटकाची कुरापतसाईनगर भागात शिवाजी महाराजांचे पोस्टर्स फाडले, मध्यरात्री घडली घटना

## नागरिकांमध्ये रोष उफाळल्याने वातावरण तापले राजापेठ, बडनेरा पोलिसांनी केले वातावरण शांत

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२१अमरावती–** सध्याघडील शहरातील चार सिनेमागृहात छावा चित्रपट दररोज रेकार्डब्रेक गर्दी खेचत आहे. तसेच चित्रपटाबाबत सोशल मिडीयावर हजारो रिल्स व्हायरल होत आहे. अशातच अज्ञात समाज कंटकाने मध्यरात्रीच्या सुमारास साईनगर भागातील शिवाजी चौकात लागलेले शिवाजी महाराजांचे पोस्टर्स फाडल्याने शिवप्रेमींमध्ये प्रचंड रोष उफाळला आहे. घटनेची माहिती मिळताच बडनेरा व राजापेठ पोलिसांनी तात्काळ घटनास्थळ गाठून वातावरण शांत केले.

माहितीनुसार, १९फेब्रुवारीला संपूर्ण देशात शिवजयंती साजरी झाली.त्यानुसार साई नगर भागातील शिवाजी चौकात देखील विविध संघटनांनी मोठया उत्साहात शिवजयंती साजरी केली. तत्पूर्वी शिवाजी चौकात नागरिकांना शिव जयंतीच्या शुभेच्छा देण्याचे अनेक पोर्स्टस लावण्यात आले होते. सर्व पोस्टर्सवर शिवाजी महाराजांचा भव्य फोटो व शुभेच्छुकांचे लहान, लहान फोटो लावलेले होते. अशातच अज्ञात समाज कंटकाने २० फेब्रुवारीच्या मध्यरात्री ३ ते ५ वाजताच्या सुमारास शिवाजी चौकातील सर्व पोस्टर्स फाडून टाकले. पहाटे ६ वाजताच्या सुमारास ही घटना उघड होताच शेकडो शिवप्रेमी घटनास्थळा जमले. शिवाजी महाराजांचे पोस्टर्स फाडल्याबद्दल शिवप्रेमींची प्रचंड रोष व्यक्त केल्याने घटनास्थळावर काहीकाळ तनाव निर्माण झाला होता. घटनेची माहिती राजापेठ व बडनेरा पोलिस तातडीने घटनास्थळी दाखल झाले.. पोलिसांनी तात्काळ रस्त्यावर पडलेले पोर्स्टर्सचे फाटलेले तुकडे उचलून गाडीत ठेवले. ज्या ठिकाणी पोस्टर्स लागले आहेत, त्या ठिकाणी मध्यरात्री ३ वाजेपर्यंत वाहन धारकांची वरदळ सुरू होती. त्यानुसार अज्ञात समाज कंटकानेमध्यरात्री ३ वाजेनंतर हे क्रूर कृत्य केले असावे, असा संशय शिवप्रेमींनी पोलिसांसमोर व्यक्त केला. त्यानुसार पोलिसांनी शिवाजी महाराजांचे पोस्टर्स फाडणाऱ्यावर कठोर करवाईचे आश्वासन देऊन वातावरण शांत केले.तरी देखील पूर्व खबरदारी म्हणून पोलिसांनी शिवाजी चौकात पोलिस बंदोबस्त तैनात केला.

# प्रकट दिनानिमित्त बाळापुरे ले आऊट मध्ये श्रींच्या मूर्तीची स्थापना

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२१नांदगाव पेठ–** श्री गजानन महाराज प्रकट दिनाच्या शुभ प्रसंगी येथील बाळापुरे ले आऊट मध्ये श्रींच्या मूर्तीची भव्य स्थापना करण्यात आली.यावेळी पंडित कुमोद पांडेय यांच्या हस्ते विशेष पूजन, अभिषेक आणि आरतीचे आयोजन करण्यात आले.श्रींच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करून त्यांच्या कृपेची प्रार्थना केली. यावेळी भाविक भक्तांच्या वतीने पालखीसह ग्रामप्रदक्षिणा करत मिरवणूक काढण्यात



आली. श्री संत गजानन महाराज यांची भव्य मूर्ती व शिवलिंग स्थापित करण्यात आले.मूर्ती स्थापनेनंतर परिसरात धार्मिक कार्यक्रम, भजन-कीर्तन आणि प्रवचन करण्यात आले. महाप्रसाद वितरित करण्यात आला. यावेळी बाळापुरे ले आउट मधील नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेऊन या धार्मिक कार्यात सहभाग घेतला यावेळी रोशन भोपळे, अमोल ठाकरे, मंगेश काळे, प्रवीण भगत, पुरुषोत्तम मोरे, पवन भोपळे, रोहित पोकळे, आकाश दारोकर,धनंजय देशमुख सह ले नागरिक उपस्थित होते.

# ओबीसीची जातनिहाय जनगणना झालीच पाहिजे

## राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे जिल्हा कचेरी समोर एक दिवसीय धरणे आंदोलन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१अमरावती**

ओबीसींची जातनिहाय जनगणना, ओबीसीसाठी स्वतंत्र ओबीसी मंत्रालय स्थापन करण्यात यावे, यासह केंद्र व राज्य सरकारच्या संबंधित ओबीसींच्या प्रलंबित मागण्यांची पूर्तता करण्यात यावी, याकरिता राष्ट्रीय ओबीसी महासंघातर्फे गुरुवारी (ता.२०) जिल्हाकचेरी परिसरात एक दिवसीय धरणे आंदोलन करण्यात आले.



ओबीसी आरक्षणाची ५० टक्के मर्यादा रद्द करण्यात यावी, क्रिमिलियरची उत्पन्न मर्यादा १५ लाख रुपये करावी, ओबीसींना लोकसंख्येच्या प्रमाणात निधी उपलब्ध करून देणे व ओबीसींचे राजकीय आरक्षण पूर्ववत सुरू करून ओबीसींना राजकीय क्षेत्रात त्तावीस टक्के आरक्षण लागू ण्यात यावे, तसेच राज्य कारने बिहारच्या धर्तीवर राज्यात बीबीसींची जातनिहाय सर्वे करावा, महाज्योतीची विभागनिहाय कार्यालये सुरू करण्यात यावी, ओबीसी मुलांना शंभर टक्के शिष्यवृत्ती देण्यात यावी, ओबीसी, विजा, भज व विमाप्र सुशिक्षित बेरोजगारांना वैयक्तिक व्याजपरतावा कर्ज मर्यादा १५ लक्ष करण्यात यावी, ओबीसी, विजा, भज व विमाप्र विद्यार्थ्यांना ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनेची रक्कम त्वरित खात्यात जमा करण्यात यावी, अनुसूचित क्षेत्रातमहामहीम राज्यपाल यांच्या अधिसूचनेनुसार वर्ग ३ व वर्ग ४ ते १७ संवर्गीय पदे भरताना शंभर टक्के अनुसूचित जमातीत्नच भरली जातात, यामुळे ओबीसी सहित इतर मागासवर्गीयओबीसीची जातनिहाय जनगणना झालीच पाहिजे समाजाचे आरक्षण शून्य झाले आहे, हे असंवैधानिक असून ओबीसी व इतर मागासवर्गीय समाजावर अन्याय होत असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. धरणे आंदोलनात प्रकाश साबळे, अनिल ठाकरे, अजिज पटेल, रितेश लोंढे, शेखर अवघड, राहुल तायडे, प्रवीण वानखडे, अरुणा फरकाडे, सविता बोबडे, राजेंद्र निकम, पुरुषोत्तम पटोडे, सुरज धरमे, दिवाकर सगने, योगेश बोबडे, सतीश तुळे, मनीषा कसारे, अरुणा फरकाळे, किशोर धनवडे, प्रवीण वानखडे, अमोल इंगळे यांच्यासह राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे शेकडो पदाधिकारी कार्यकर्ते सहभागी झाले होते.

# लाखोंची फसवणूक करणाऱ्या पंजवानीला अखेर अटक

## सात दिवसांचा पीसीआर, आर्थिक गुन्हे शाखा करतेयं तपास

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१अमरावती**

बिझीलँड येथील गुरुकृपा गारमेंट्सच्या व्यवस्थापकाने दुकान मालकाची ५३ लाख रुपयांची फसवणूक केल्याचे प्रकरण समोर आले आहे. जिथे आरोपीने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली पण सर्वोच्च न्यायालयाने जामीन अर्ज फेटाळला. यानंतर, अमरावतीमध्ये या प्रकरणाचा तपासकरणाऱ्या आर्थिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी अखेर मंगळवारी आरोपी अनिल पंजवानी याला अटक केली. न्यायालयाने त्याला ७ दिवस पोलिस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत. या प्रकरणात पोलिस पुढील तपास करीत आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, अमर आहुजा यांचे बिझीलँडमध्ये गुरुकृपा गारमेंट नावाचे दुकान आहे. अनिल पंजवानी या दुकानात मॅनेजर म्हणून काम करायचे. मग, एक चांगला मित्र आणि भाऊ असल्याने, अमरने संपूर्ण व्यवसायअनिलकडे सोपवला आणि त्याशिवायतो त्याला चांगला पगारही देत असे. पण पैशाच्या लोभापोटी, अनिलने दुकानात आणि गोदामात ठेवलेले लाखो रुपयांचे सामान दुसऱ्याचव्यावसायिकाला विकले आणि ते लाखो रुपये हडप केले. परंतु ही बाब दुकान मालक अमर आहुजा यांना कळली तेव्हा त्यांनाव्यावसायिकाला विकले आणि ते लाखो रुपये हडप केले.



परंतु ही बाब दुकान मालक अमर आहुजा यांना कळली तेव्हा त्यांनावस्तू आणि १७ लाख ९२ हजार रुपयांची वसुली समाविष्ट होती. त्यानंतर फसवणुकीचे संपूर्ण प्रकरण उघडकीस आले. सुरुवातीला काही व्यावसायिक संघटनांनी हे प्रकरण दाबण्याचा प्रयत्न केला पण अखेर अमर आहुजा यांनी पोलिसांचे दरवाजे ठोठावले आणि न्याय मागितला. आरोपी अनिल पंजवानी यांनी सर्वोच्च न्यायालयात जामीन अर्ज दाखल केला होता परंतु तो फेटाळण्यात आला.आर्थिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी मंगळवारी अनिल पंजवानी यांना अटक करून न्यायालयात हजर केले. न्यायालयाने त्याला २ फेब्रुवारीपर्यंत पोलिस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत.

**सध्या कोणताही माल जप्त नाही**

मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी अनिल पंजवानी याने लाखो रुपयांचा माल जवळच्या एका व्यावसायिकाला बेकायदेशीरपणे विकला होता. पण नंतर पोलिसांनी हे प्रकरण गांभीयनि घेतले आणि आरोपींना अटक केली. पण आतापर्यंत त्यांच्याकडून कोणताही माल जप्त करण्यात आलेला नाही.

# गजानन महाराज प्रगटदिन उत्साहात : महाप्रसादाचे वितरण, शेकडो भाविकांनी घेतला लाभ



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१धारणी**

येथील गजानन महाराज मंदिर संस्थानकडून भक्तगणांकरिता महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी आमदार केवलराम काळे सोबतच इतर प्रतिष्ठित नागरिकांनी प्रगटदिनाचे औचित्य साधून श्री गजानन महाराज मंदिरात महाराजांचे दर्शन घेऊन आशीर्वाद घेतले.

संत श्री गजानन महाराज यांचा प्रगटदिन येथील गजानन महाराज मंदिरात श्री गुरूंचे नामस्मरण, आराधना आणि मंत्रांचा जप यासोबतच महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

गुरुवारी सकाळी आमदार केवलराम काळे यांनी मंदिरात भेट देऊन आशीर्वाद घेतले. यासोबतच मुख्याधिकारी लोहकरे, इतर प्रतिष्ठित नागरिक आणि भक्तगण मोठ्या संख्येने गजानन महाराज यांचे दर्शन आणि महाप्रसाद घेण्याकरिता उपस्थित झाले होते. कार्यक्रमाकरिता विजयपाल कडू, युगधर सोनोने, दिलीप गावंडे, बंटी ठाकरे, गजानन थोरात, कपिल सहारे, पंकज मोरे, पंकज माकोड़े, मनीष मोहोड, डॉ. शैलेश जिराफे, रवि सावलकर, राहुल सोनोने, सुनील परीहार, सचिन पटेल व मंदिर संस्थानच्या पदाधिकारी आणि सदस्यांनी परिश्रम घेतले.

# सहाय्यक कार्यक्रम अधिकाऱ्याचे निलंबन बेकायदेशीर : निलंबन आदेश रद्द, न्यायालयाचा निर्णय

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१वरुड**

वरुड पंचायत समितीमध्ये सन २०२१ पासून सहाय्यक कार्यक्रम अधिकारी म्हणून कार्यरत असलेले विलास पाटील यांच्यावर वृत्तपत्रात काम करत असल्याचा ठपका ठेवून जिल्हा परिषद प्रशासनाने त्यांचे निलंबन केले होते. या कार्यवाहीविरोधात १७ फेब्रुवारी २०२५ रोजी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने पाटील यांचे हे निलंबन बेकायदेशीर असल्याचे सांगत जिल्हा परिषद प्रशासनाने दिलेले हे आदेशच रद्द केले. त्यामुळे याचिकाकर्ता विलास पाटील यांना दिलासा मिळाला आहे.

विलास पाटील हे वरुड पंचायतसमितीमध्ये १ जानेवारी २०२१ रोजी ई-गव्हर्नन्स सोल्यूशन्स प्रायव्हेट लिमिटेडच्या माध्यमातून कंत्राटी कर्मचारी नियुक्त झाले होते. त्यांना सहायक कार्यक्रम अधिकारी म्हणून नियुक्तकरण्यात आले होते. जामगाव खडका येथील माजी सरपंच मनोज पेलागडे यांनी विलास पाटील हे वृत्तपत्राचे काम करत असल्याची तक्रार जिल्हा परिषदेचे तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) अविशांत पंडा यांच्याकडे केली होती.या तक्रारीच्या आधारावर सीईओ पंडा यांनी विलास पाटील यांना



वरुडपंचायत समितीचे सहाय्यक कान अधिकारी या पदावरुन निलंबित तसे लेखी आदेश त्यांनी दिले होते.या आदेशाविरुध्द उच्च न्यायान दाद मागितल्यावर न्यायालयान निलंबन अवैध ठरवून निलंबन आ केले. त्यामुळे आता सहाय्यकक अधिकारी विलास पाटील यांचा मार्ग मोकळा झाला आहे.

**काय म्हणाले न्यायालय**

न्यायालयाने सुनावणीमध्ये स्पष्ट केले की, याचिकाकर्ते हे कंत्राटी कर्मचारी असल्यामुळे संबंधित विभागाला त्यांना निलंबित करण्याचा अधिकार नाही. न्यायालयाने यावर आधारित, ८ सप्टेंबर २०२२ चा निलंबन आदेश रद्द केला. न्या. अविनाश घरोटे व न्या. अभय मंत्री यांच्या न्यायपिठाने ही याचिका मंजूर केली. न्यायालयाने सांगितले की, कंत्राटी कर्मचारी असलेल्या याचिकाकर्त्याच्या निलंबनाचा आदेश राज्य सरकारच्या धोरणानुसार बेकायदेशीर होता. याचिकाकर्त्याची बाजू नागपूरचे प्रसिद्ध वकील ॲड. अभिनव पन्नासे यांनी मांडली.

# ‘श्रीं’च्या मुख दर्शनासाठी १ तास; प्रत्यक्ष दर्शनासाठी ६ तास प्रतीक्षा

## दीड लाखांच्यावर भाविक श्री गजानन महाराजांच्या चरणी





**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१शेगाव**

गण गण गणात बोते च्या गजरात टाळ मृदंगांच्या निणादात शेगाव येथे श्रीं चा १४७ वा प्रकट दिन मोठ्या उत्साहात साजरा झाला. दिवसभरात दीड लाखांच्यावर भाविकांनी श्रींचे दर्शन घेतले. श्रींच्या मुख दर्शनासाठी एक तास, तर मंदिरात जाऊन प्रत्यक्ष दर्शनासाठी सहा तास प्रतीक्षा करावी लागली. सकाळपासूनच दर्शनासाठी भाविकांच्या रांगा लागल्या होत्या.

श्रींचा प्रकट दिन उत्सव १३ फेब्रुवारीपासून धार्मिक प्रथा परंपरेनुसार दररोज सकाळी सहा वाजेपासून काकडा, गाथा, भजन, प्रवचन, हरिपाठ, श्रीहरी कीर्तन, संपन्न झाले आज सकाळी १० वाजता यागाची पूर्णाहुती झाली. श्रींच्या प्रकट दिनानिमित्त श्रीहरी कीर्तन झाले. चार वाजता श्रींची पालखी परिक्रमेसाठी मंदिरातून निघाली गज अश्व मेना टाळकरी श्रींच्या नाम घोषासह टाळ मृदंगांच्या निनादात मंदिरातून निघाली पालखी तीन पुतळा परिसर येथून प्रकट स्थळी पोहोचली. प्रकट स्थळी पालखीची आरती झाली. श्री नाम घोष करत पालखी पालखी मंदिरात पोहोचली. प्रगट दिनानिमित्त श्रींचे मंदिर रात्रभर खुले होते.

खामगाव, वरवट, अकोट, नागझरी, गौलखेड, मार्गे भाविक पायी व मिळेल त्या वाहनाने शेगावात दाखल होत होते. प्रकट दिनानिमित्त श्री संत गजानन महाराजांचे दीड लाखांच्यावर भाविकांनी दर्शन घेतले. मुख दर्शनासाठी एक तास तर दर्शनासाठी सहा तास प्रतीक्षा करावी लागत होती. दिवसभर विविध सामाजिक संस्था, संघटना यांच्याकडून महाप्रसाद, चहा, पाण्याची वितरण अविरत केल्या जात होते. पालखी मार्गात वरून रमण आर्ट वर्धा यांनी रांगोळी काढत होते. प्रकट दिनानिमित्त शेगावात पोलिसांचा असा बंदोबस्त होता.


तगडा पोलिस बंदोबस्त अप्पर पोलिस अधीक्षक अशोक थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली, ८ पोलिस निरीक्षक, २६ पोलिस अधिकारी, १७७ पोलिस अंमलदार, ४४ महिला पोलिस कर्मचारी, ४८ वाहतूक पोलिस अंमलदार, ४५ सध्या वेशातील पोलिस अधिकारी व कर्मचारी, २ आरसीबी पथके यांनी तगडा पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# ई-क्लास जमिनीवर ५ हजार आंब्यांच्या झाडांची बाग

## मधापुरीत ३५ हजारांवर झाडांची लागवड केल्याने गावातील हवा शुद्ध; ऑक्सिजन पातळीही वाढली

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१मूर्तिजापूर**

मूर्तिजापूर ते अमरावती दरम्यान राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५३ पासून दोन किलोमीटर अंतरावर तीन हजार लोकसंख्या असलेले मधापुरी (ता. मूर्तिजापूर) गाव. या गावाने विकासात्मकदृष्ट्या मोठी भरारी घेतली आहे. गावाचे नाव उंचावण्याचे काम ग्रामपंचायत व गावकऱ्यांच्या माध्यमातून सातत्याने सुरू आहे. गावालगतच्या पडीक ई क्लास जमिनीवर ग्रामस्थांनी ग्रामपंचायतीच्या मदतीने श्रमदानातून पाच हजार आंब्यांच्या झाडाची बाग फुलवली आहे. ग्रामपंचायतीनेही शासनाच्या विविध योजनांच्या अंतर्गत गावात वृक्ष लागवड करून आजपर्यंत ३५ हजार झाडे जतन केली आहेत. त्यामुळे गावातील हवाही शुद्ध असून, ऑक्सिजन लेव्हलही वाढली आहे. तालुक्यातील आदर्श ग्रामपंचायत मधापुरी येथील सरपंच व सदस्यांनी गावकऱ्यांच्या सहकार्याने



ग्रामपंचायतीच्या ई-क्लास जमिनीवर ५ हजार आंब्याची झाडे लावून आंब्याची बाग तयार केली असून, संपूर्ण महाराष्ट्रात ही बाब लक्षवेधी ठरत आहे. तालुक्यातील मधापुरी हे आदर्श ग्राम असून ग्रामपंचायतीच्या माध्यमातून शासनाची विविध योजनेतील ग्रामविकासाची कामे पूर्ण केल्याने ग्रामपंचायतला १३ पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. संपूर्ण महाराष्ट्रात ५ हजार आंब्याची झाडांची लागवड करणारे एकमेव गाव म्हणजे मधापुरी. विशेष म्हणजे या झाडांना पाणीपुरवठा हा ठिंबक सिंचन पद्धतीने करण्यात आला आहे. सर्व झाडे चांगल्या पद्धतीने जतन केल्या जात असल्याचे दिसून येत आहे. त्यातील काही झाडांना मोहोर आलेला असून, काही झाडांना बारीक बारीक आंबे लागल्याचे देखील दिसून येत आहे. मधापुरी गाव सर्वदृष्टीने आदर्श व्हावे याकरिता सरपंच अंजली प्रदीप ठाकरे तसेच उपसरपंच व सर्व ग्रामपंचायत सदस्य आणि गावकरी मंडळी हे परिश्रम घेत आहेत.

# विदर्भ कॉन्ट्रॅक्टर असोसिएशनचे आंदोलन सार्वजनिक बांधकाम विभागाला घेराव

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१अमरावती**

सार्वजनिक बांधकाम विभागाकडून गेल्या दोन वर्षांपासून प्रलंबित असलेल्या थकीत देयकांच्या विरोधात विदर्भ कॉन्ट्रॅक्टर असोसिएशनने आक्रमक पवित्रा घेतला आहे. याच पार्श्वभूमीवर आज (दि. २१ फेब्रुवारी २०२५) मुख्य अभियंता कार्यालयावर ठिय्या आंदोलन करून घेराव टाकण्यात आला.

₹२५९४ कोटींचे देयक थकीत - कंत्राटदारांमध्ये तीव्र असंतोषअमरावती प्रादेशिक विभागात कंत्राटदारांचे तब्बल ₹२५९४ कोटी तर संपूर्ण महाराष्ट्रात ₹२७,००० कोटींचे बिल अडकून आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून संबंधित यंत्रणेकडे पाठपुरावा करूनही कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. त्यामुळे असोसिएशनच्या सदस्यांनी सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी करत आपला रोष व्यक्त केला.भजन-कीर्तनातून सरकारचा निषेधआंदोलकांनी अनोख्या पद्धतीने भजन-कीर्तन करत सरकारच्या भूमिकेचा निषेध केला. हे आंदोलन शांततामय पद्धतीने पार पडले असले तरी भविष्यात अधिक तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे. विदर्भ कॉन्ट्रॅक्टर असोसिएशनने दि. २४ फेब्रुवारी २०२५ रोजी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच, दि. १ मार्चपासून संपूर्ण महाराष्ट्रभर कामबंद आंदोलन करण्याची तयारी सुरू आहे. जर सरकारने त्वरित थकीत देयकांचे निराकरण केले नाही, तर मार्च महिन्यात मुंबईच्या आझाद मैदानावरून मंत्रालयावर भव्य मोर्चा काढण्याचा इशारा संघटनेने दिला आहे.

# समर्थ कॉलनी येथे श्रींचा प्रगट दिन महोत्सव साजरा

## गण गण गणात बोते च्या गजराने कॉलनी परिसर दणाणला : सामाजिक, राजकीय मंडळींची उपस्थिती

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१अमरावती**

समर्थ कॉलनी येथील मंदिरात सुरू असलेल्या शिव महापुराण कथा व विविध सामाजिक अध्यात्मिक कार्यक्रमाची आज ह. भ. प .रवींद्र महाराज काळमेघ यांच्या गोपालकाल्याच्या कीर्तनाने व महाप्रसादाने सांगता करून श्री चा प्रकट दिन महोत्सव हर्शोल्लात पार पडला. माऊली जय माऊली अशा एकाहून एक भजनासह भाविकांनी श्रींचा प्रकट दिन महोत्सव साजरा करून सात दिवसीय कार्यक्रमाची सांगता केली. या सात दिवसात शिव महापुराण कथा, भजन संध्या, ह. भ. प .अभिषेक महाराज पन्नासे यांचे कीर्तन, ह .भ. प. भारुड सम्राट सुमित महाराज मेश्राम यांचे भारुड ,संकेत जोशी यांचे स्वरनाद, भावभक्तीचा , इंजि दिनकर चोरे वरखेड



यांचे कीर्तन अशा विविध कार्यक्रमासह शोभायात्रा व दिंडी पालखी सोहळा साजरा करण्यात आला. गोपालकाल्याचे किर्तन करून ह .भ. प .रविंद्र महाराज काळमेघ यांनी भाविकांना मंत्रमुग्ध केले. टाळ, मृदुंग, ढोल, ताशाच्या गजरात व भक्त मंडळींच्या भजनाच्या सुरात श्रींची भव्य पालखी समर्थ, विवेकानंद कॉलनी, रुक्मिणी नगर ,श्री विकास कॉलनी ,राजा नगर, परिसरातून पालखी काढण्यात आली होती. यावेळी पालखीचे ठिकठिकाणी भाविकांनी रांगोळ्या ,पूजन ,आरती करून स्वागत केले. गजानन महाराजांचे नामस्मरण करून भाविक पालखीच्या दर्शनाचा आनंद घेत होते भाविकांना गजानन महाराजांच्या भक्तीची धुंद चढली होती. यानंतर पालखीचे आगमन मंदिरात झाल्यावर त्यानंतर भव्य महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. सात दिवशीय चालणाऱ्या या महोत्सवासाठी आयोजक विश्वस्त मंडळ श्री समर्थ गजानन महाराज मंदिर कृती समिती व भाविकांनी अथक परिश्रम घेतले.

# आत्मनिर्भरतेतून 'विकसित भारत'कडे नेणारा अर्थसंकल्प

## अर्थसंकल्पामुळे नागरिक होतील देश विकासाचे भागीदार : प्रत्येक घटकाच्या बळकटीकरणासाठी ठोस तरतुद; द्रशेखर बावनकुळे यांचे प्रतिपादन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सादर केलेला हा सर्वसमावेशक अर्थसंकल्प विकसित भारताच्या दिशेने जाणारा मार्ग अधिक प्रशस्त करणारा आहे. सर्वसामान्य मध्यमवर्गीयांची बचत वाढणार असून त्यांची क्रयशक्ती उंचावल्याने देशाच्या विकासाला चालना मिळेल. १४० कोटी भारतीयांच्या आशा-आकांक्षा पूर्ण करणारा हा अर्थसंकल्प असून विकसित भारताचे ध्येय सामान्य नागरिकच पुढे नेतील, असा विश्वास भाजपाचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष, राज्याचे महसूलमंत्री, नागपूर व अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज अमरावती येथे पत्रकार परिषदेत बोलतांना व्यक्त केला. नागरिकांची बचत वाढून तेच देशविकासाचे भागीदार कसे



बनतील, यासाठी विशेष तरतुदी करण्यात आल्या असल्याचेही त्यांनी नमूद केले.

श्री. बावनकुळे म्हणाले की, शेतकरी, गरीब, महिला आणि युवा हे विकसित भारताचे चार प्रमुख स्तंभ असून या चारही गटांच्या सशक्तीकरणासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारच्या अर्थसंकल्पाने महत्वपूर्ण पावले उचलली आहेत. सामाजिक क्षेत्र, लहान मुले व युवाशिक्षण, पोषण तसेच आरोग्यापासून स्टार्टअप्स आणि गुंतवणुकीपर्यंत प्रत्येक क्षेत्राला गती देणाऱ्या तरतुदी करण्यात आल्या आहेत. हा अर्थसंकल्प गरीब आणि मध्यमवर्गीयांना सशक्त करणार असून तरुणांना रोजगाराच्या असंख्य संधी निर्माण करणारा आहे, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.ग्रामीण विकासासाठी कृषी क्षेत्र, उद्योजकता वाढ, रोजगारनिर्मिती, MSME क्षेत्र, पायाभूत सुविधा आणि नाविन्यासाठी गुंतवणूक तसेच जागतिक स्तरावर आर्थिक स्पर्धात्मकतेसाठी निर्यात क्षेत्र या चार प्रमुख आधारस्तंभांवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. करप्रणाली, शहरी विकास, खाणकाम, वित्तीय सुधारणा, ऊर्जा आणि नियामक सुधारणा या सहा क्षेत्रांतील सुधारणांना प्राधान्य देण्यात आले आहे, असेही भाजपा प्रदेशाध्यक्षांनी स्पष्ट केले.जन आरोग्य योजना, सक्षम अंगणवाडी व पोषण २.० कार्यक्रम, गिग वर्कर्सचे कल्याण आणि जलजीवन मिशन यांसारख्या योजनांना अधिक बळ देत सामाजिक न्याय व जनकल्याणालाही सरकारने प्राधान्य दिले आहे, असेही चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले.प्रास्ताविक भाजपाचे महाराष्ट्र प्रदेश प्रवक्ते शिवराय कुळकर्णी यांनी केले. यावेळी प्रवीण पोटे पाटील, आ. प्रताप अडसड, आ. राजेश वानखडे, आ. प्रवीण तायडे, आ. केवलराम काळे, आ. उमेश यावलकर, आ. रवी राणा प्रामुख्याने उपस्थित होते.

# सरकारी गोड खिचडीसाठी घरूनच न्या साखर

## शाळा व्यवस्थापन समितीवर असणार जवाबदारी





**अरुण जोशी**

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती**

केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत राज्यातील पात्र शाळांमध्ये इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार दिला जातो. मात्र, २८ जानेवारी २०२५ रोजी राज्य शासनाने पोषण आहाराच्या मेनूमध्ये बदल केले.

यात गोड खिचडीसाठी लागणाऱ्या साखरेसाठी शासनाकडून निधी दिला जाणार नाही, असे स्पष्ट मत नमूद आहे. आता या गोड खिचडीसाठी पालकांना साखर मागितली जाणार आहे. ही साखर शाळा व्यवस्थापन समितीच्या माध्यमातून लोकवर्गणीतून गोळा करावी लागणार आहे.स्थानिक स्वराज्य संस्था आणि अनुदानित शाळांमध्ये गरीब कुटुंबातील मुले शिक्षण घेतात. बरेच पालक दररोज उदरनिर्वाहासाठी मोलमजुरी करतात, अशा परिस्थितीत साखर गोळा करून गोड खिचडी बनविणे हास्यास्पद असल्याचे बोलले जात आहे. शासनाने निर्णय घेतला तर त्यानुसार साखरेचाही पुरवठा करायला हवा होता, असा सूरही ऐकावयास मिळत आहे; पण शासन निर्णयात ही बाब नाहीच. आता शाळा व्यवस्थापन समितीच्या सहकार्याने साखर गोळा करावी लागणार आहे.

### मेनूमध्ये नवनवीन बदल

पोषण आहाराच्या मेनूमध्ये नवनवीन अन्नपदार्थांचा समावेश करून विद्यार्थ्यांची परीक्षा घेतली जात आहे. सामान्यतः परिस्थितीनुसार विद्यार्थ्यांना ठरलेल्या अन्नाची आवड झालेली असते. त्यामुळे ते नवीन बदल स्वीकारित नाही. त्यामुळे आता बालकांना खिचडी आवडेल का? हा प्रश्न आहे.

### साखर मागा नाही तर खिशातून पैसे टाका

खिचडी शिजविण्यासाठी पालकांकडे साखर मागावी लागणार आहे. मिळाली नाही तर मुख्याध्यापक व शिक्षकांना खिशातून पैसे द्यावे लागतील.राज्य शासनाने निर्णय घेतला तर साखरेचाही पुरवठा करायला हवा होता. पोषण आहारातील पूरक अन्नपुरवठ्यासाठी शासनाने आधीच तरतूद केली आहे. पण साखर गोळा करण्याचे काम ही आता करावे लागणार आहे. त्यामुळे शिक्षकांनी अध्यापनाचे कार्य करायचे की नाही, असे झाले आहे.

**राजेश सावरकर (राज्य प्रसिद्धी प्रमुख)अमरावती.**

# एकनाथ शिंदेंना धमकी : मुंबई पोलीस रात्रीच बुलढाण्यात धडकले

## नात्याने मामेभाऊ-आतेभाऊ असलेल्या दोन युवकांना अटक




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१बुलढाणा**

उपमुख्यमंत्री तथा शिंदे सेनेचे सर्वेसर्वा एकनाथ शिंदेंच्या शासकीय वाहनाला बॉम्बने उडवण्याच्या धमकी देणारे पराक्रमी(!) युवक सिंदखेड राजा मतदारसंघातील आणि बुलढाणा जिल्ह्यातील आहेत. नात्याने मामेभाऊ-आतेभाऊ असलेल्या या युवकांना आज मुंबई पोलिसांनी देऊळगाव राजा (जि. बुलढाणा ) पोलिसांच्या मदतीने देऊळगाव माही येथून अटक केली. अत्यंत काटेकोर गुप्ततेत कारवाई करण्यात आली असली तरी समाज माध्यमाच्या कृपेने ही धक्कादायक घडामोड वादळाच्या वेगाने सर्वत्र पसरली. यामुळे मतदारसंघसाह बुलढाणा जिल्ह्यात एकच खळबळ उडाली.

राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे शासकीय वाहन बॉम्बने उडवून दिले जाईल, अशी धमकी गुरुवारी मुंबई येथील काही पोलीस ठाणे आणि मंत्रालयाला 'ईमेल'द्वारे प्राप्त झाली होती. यानंतर लगेच मुंबई पोलीस, दहशतवाद विरोधी पथक (एटीएस) सतर्क होऊन 'अॅक्शन मोड'वर आले. गुरुवारी रात्री प्राप्त गोपनीय माहितीच्या आधारे गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय रासकर व देऊळगाव राजा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष महल्ले, सहाय्यक पोलीस निरीक्षक हेमंत शिंदे व मुंबई एटीएस पथक देऊळगाव मही (ता. देऊळगाव राजा, जि. बुलढाणा ) येथे धडकले. दरम्यान धमकीच्या 'ई-मेल आयडी अॅड्रेस'वरून अभय शिंगणे वय २५ व मंगेश वायाळ यांना देऊळगाव महीमधून ताब्यात घेण्यात आले. दोघा आरोपींना एटीएस पथकाने अटक करून मुंबई येथे नेले.अटक करण्यात आलेले दोन्ही आरोपी नातेवाईक असून मामेभाऊ आत्या भाऊ असल्यावर चौकशीत शिक्कामोर्तब झाले आहे. मंगेश वायाळ याने अभयच्या दुकानात मोबाईल चार्जिंगला लावला होता. तेथूनच धमकीचे ई-मेल पाठविण्यात आल्याचे अतिप्राथमिक चौकशीत निष्पन्न झाले. विशेष म्हणजे, मंगेशच्या 'आयडी'वरून पाठविण्यात आलेले हा पहिलाच ई-मेल आहे. शिवाय यातील मंगेश वायाळ हा अल्पशिक्षित तर अभय शिंगणे हा जेमतेम बारावी उत्तीर्ण आहे.

# अचलपुर कृषी उत्पन्न बाजार समितीवर सौ प्रतीभा ठाकरे निर्वीरोध



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अचलपुर**

माजी . सभापती राजेंद्र गोरले यांनीरांजीनामा दिल्या नंतर आज शुक्रवार रोजी अचलपुर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या च्या सभापती पदा च्यानिवडणुकीत सहकार पॅनल च्या सौ . प्रतिभा प्रशांत ठाकरे यांची एकमताने निवड करण्यात आली . १८ सदस्य असलेल्या अचलपूर बाजार समितिचा मोठा व्याप असुन जिल्हात दुसऱ्या क्रमांकची बाजार समीती आहे . अचलपूर बाजार समितीत बच्चू कडू यांचे शेतकरी पॅनल पेक्षा बबलू देशमुख यांचा सहकार पॅनल चे अधिक सदस्य निवडून येऊन अचलपुर कृऊबा समिति चे सभापती राजेंद्र गोरले यांची सभापती म्हणुन निवड झाली होती . मात्र अचानक ३ फेब्रुवारी ला राजेंद्र गोरले यांनी राजीनामा दिला होता . तर बाजार समिती च्या १३ संचालकांनी त्यांच्या विरोधात अविश्वास ही प्रस्ताव दाखल केल्याने अचलपूर तालुक्यातील सहकार क्षेत्रात खळबळ उडाली होती .त्या अनुशंघाने आज २१ फेबुवारी रोजी सकाळी ११ वाजता अचलपुर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभागृहात रिक्त सभापती पदासाठी निवडणुक घेण्यात आली यावेळी अध्याशी अधिकारी म्हणून पि .एन . गुल्हाने याच्या देखरेखीत सभा सुरू झाली उपस्थित १३ सदस्यां पैकी सहकार पॅनलच्या सौ . प्रतिभा ठाकरे यांचा एकमेव अर्ज आला असल्या मुळे त्यांची अविरोध निवड करण्यात आली . सतिष पाटील,रविंद्र पाटील,गोपाल लहाने, सुधीर राहाटे,ज्ञानदेव पाटील,प्रतिभा ठाकरे, वर्षा आवारे,बाबुराव गावंडे,अनिल पवार,अतुल वाठ,नितिन आगे,अजिंक्य अभ्यंकर,अमोल बोरेकर ,सतिषकुमार व्यास,,महादेव (पोपट) घोडेराव आदी संचालक उपस्थित होते. निवडणूक प्रक्रिया झाल्यानंतर सभागृहात बबलु देशमुख यांच्या उपस्थितीत बैठक आभार बैठक आयोजित करण्यात आली होती यावेळी आदी अनेक पदाधीकारी कार्यकर्ते मोठ्या संखेत उपस्थित होते .

# राज्यात उन्हाचा तडाखा, पण हवामान खाते म्हणते....

## देशातील अनेक भागात पावसाची शक्यता

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१नागपूर**

राज्यातीलच नाही तर संपूर्ण देशात हवामानात सातत्याने बदल होत आहेत. दरम्यान, भारतीय हवामान खात्याने दिलेल्या माहितीनंतर देशाच्या काही भागात पावसाचा इशारा देण्यात आला आहे. महाराष्ट्रात सध्या उन्हाचा तडाखा आहे, पण बंगालच्या उपसागरातील चक्रीवादळामुळे काही भागांमध्ये पुढील दोन दिवसांत पावसाचा अंदाज आहे. राज्यातील तापमान येणाऱ्या तीन दिवसांत वाढ होण्याची शक्यता आहे. मुंबई, नाशिक, पुणे आदी शहरांमध्ये तापमानात वाढ झाली आहे. तर विदर्भात तापमानाचा पारा चढलेला आहे. उष्णतेपासून बचाव करण्याचा सल्ला देण्यात आला आहे. देशातील अनेक भागातही पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.



भारतीय हवामान खात्याच्या माहितीनुसार देशाच्या उत्तरेकडे पश्चिमी झंझावात सक्रिय झाल्यामुळे तापमानात घट झाली आहे. त्यामुळे देशाच्या काही भागांमध्ये पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. मध्य भारतामध्ये कमाल तापमानात वाढ होत आहे. तर, दक्षिण भारतात देखील तापमानात वाढ होताना दिसून येत आहे. महाराष्ट्रात मात्र उन्हाच्या झळांना सुरुवात झाली आहे. राज्यातील आणि त्यातही विदर्भातील अधिकांश जिल्ह्यांमध्ये तापमानात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. किमान आणि कमाल तापमानामध्ये मोठ्या प्रमाणात बदल झाले आहेत.

विदर्भातील जवळजवळ सर्वच जिल्ह्यात तापमानाच्या पाऱ्यात दिवसागणिक वाढ होत आहे. फेब्रुवारीच्या पूर्वार्धातच राज्यात कमाल तापमानाने चाळीशी गाठली होती. सध्या राज्यातील सर्वाधिक तापमानाची नोंद सोलापूरमध्ये करण्यात आली असून, याठिकाणी कमाल तापमान ३८ अंश सेल्सिअस इतके नोंदवण्यात आले. काही भागांमध्ये मात्र उन्हाचे चटके आणि थंडी असे दोन्ही जाणवत आहे. दिवसा घाम फोडणारा उकाडा असतानाच रात्री आणि पहाटेच्या वेळी मात्र हवेत गारठाही जाणवत आहे. मुंबईसुद्धा या उष्म्याला अपवाद नाही.

शहरात सध्या कमाल तापमान वाढले असून उन्हाचे चटके जाणवत आहेत. कोकण किनारपट्टी क्षेत्रासह राज्यातील सागरी किनारपट्टी भागामध्ये दमट वातावरणात वाढ झाली आहे. समुद्राच्या पृष्ठावरून वाहणारे उष्ण वारे तीव्र उन्हाळ्याची जाणीव करून देत आहेत. मुंबई, ठाणे, पालघरसह रत्नागिरी आणि बहुतांश कोकणालाही उन्हाचा तडाखा बसतना दिसत आहे.हवामान खात्याच्या माहितीनुसार मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील काही भागांमध्ये अंशतः ढगाळ वातावरण राहील. त्यामुळे उकाड्यात प्रचंड वाढ होणार आहे. हवामान खात्याने २३ फेब्रुवारीपर्यंत देशातील अनेक भागात पावसाचा इशारा दिला आहे. पश्चिम बंगालच्या गंगा मैदानात २३ फेब्रुवारीपर्यंत पाऊस पडण्याची शक्यता आहे. बिहार आणि झारखंडमध्ये २२ आणि २३ फेब्रुवारीला पाऊस पडण्याची शक्यता आहे. तसेच, ओडिशामध्ये २३ फेब्रुवारीपर्यंत पाऊस पडण्याची शक्यता आहे.

# उन्हाळ्यात रेल्वेचे आरक्षित तिकीट वेटिंग लिस्ट वर : गर्दी वाढल्याने प्रवाशांचे आरक्षण वेटिंग वर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती**

उन्हाळ्याच्या सुट्टांमध्ये अनेकजण फिरायला जाण्याचे नियोजन करतात. मात्र, ऐनवेळी प्रवासाला निघाले तर अडचणी येऊ शकतात. आताच रेल्वे गाड्यांचे आरक्षण फुल्ल आहे. उन्हाळ्यात रेल्वेचे आरक्षित तिकीट मिळणेही कठीण जाते. तेव्हा आतापासूनच तिकिटांचे आरक्षण केले, तर प्रवासाचे निम्मे टेंशन दूर होईल.

मुलांच्या द्वितीयसत्र परीक्षा संपल्या की कुठे तरी फिरायला जाण्याचे नियोजन केले जाते. त्यात अनेकजण देवदर्शनाचा बेत आखतात, तर काहीजण मुंबई, पुणे या ठिकाणी जातात. उन्हाळ्यात हिमाचल प्रदेश, मध्य प्रदेशातही जाणाऱ्यांची संख्या अधिक आहे. साधारणतः एप्रिल महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात परीक्षा संपतात. त्यानंतर मे महिन्यात बहुतांश जण फिरायला जाण्याचे नियोजन करतात.



फिरायला जाताना सर्वात महत्त्वाचे म्हणजे प्रवास सोयीस्कर होणे गरजेचे असते. ऐनवेळी तिकीट बुकिंग करण्याचा प्रयत्न केला तर ते मिळत नाहीत. मग पर्यायी व्यवस्था शोधावी लागते आणि धावपळ होते. त्यामुळे उन्हाळ्यात फिरायला जात असाल तर आतापासूनच रेल्वेच्या तिकिटांचे बुकिंग करणेही तेवढेच महत्त्वाचे आहे. त्यादृष्टीने नियोजन करावे लागेल. त्यामुळे आतापासूनच रेल्वेचे आरक्षण बुक करण्याची तयारी करावी लागणार आहे.अमरावती जिल्ह्यातून पुणे, मुंबई नवी दिल्ली,तिरुपती बालाजी या महानगरांसह जयपूर, गोवाकडे जाणाऱ्या प्रवाशांची संख्या अधिक आहे. या ठिकाणाहून देशभरात प्रवास करतात.

**तर प्रवासाचा आनंद**

उन्हाळ्यात रेल्वे प्रवाशांची संख्या पटीने वाढते. अशा वेळी आरक्षित तिकिट मिळणे कठीण जाते. आधीपासूनच आरक्षित तिकिटाचे बुकींग करुन ठेवले असेल तर रेल्वे प्रवास करण्याचा आनंद आणखी वाढतो. त्यामुळे आतापासूनच रेल्वेची तिकीट बुक केल्यास उन्हाळ्यात अडचण होणार नाही.

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा एक्केचाळिसावा दीक्षांत समारंभ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा ४१वा दीक्षांत समारंभ रविवार, २३ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ११ वाजता विद्यापीठ परिसरात संपन्न होणार आहे. या समारंभाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल आणि विद्यापीठाचे कुलपती श्री. सी.पी. राधाकृष्णन असतील, तर सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती भूषण रामकृष्ण गवई प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहतील.

या समारंभात ३८,३०५ पदवीधारक आणि २३८ पदविकाधारक विद्यार्थी पदवी आणि पदविका स्वीकारतील. १२२ सुवर्ण, २२ रौप्य आणि २४ रोख पारितोषिके एकूण १६८ गुणवत्ताप्राप्त विद्यार्थ्यांना वितरित केली जातील. विशेषतः कु. हर्षाली हटवार, कु. निकिता देवचे आणि कु. उत्कर्षा वानरे यांनी सर्वाधिक सुवर्णपदके पटकावली आहेत.

यावर्षी ३५० संशोधकांना आचार्य पदवी प्रदान केली जाणार आहे. तसेच, विद्यापीठाच्या यूट्यूब चॅनेलवर या समारंभाचे थेट प्रक्षेपण करण्यात येणार आहे.